# ऐरणीवरचे घाव

भारतीय श्रमशोध मंडळ, मुंबई - पुणे

# ऐरणीवरचे घाव

भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र प्रदेशातील
निवडक कार्यकर्त्यांचा अभ्यास वर्ग

मा. दत्तोपंतजी ठेंगडी यांच्या
भाषणांचे संकलन

भारतीय श्रमशोध मंडळ, मुंबई - पुणे

प्रकाशक : मुकुंद गोरे
भारतीय श्रमशोध मंडळ,
१८५ शनवार पेठ,
पुणे ४११०३०

•

किंमत ८ रुपये

•

एक एप्रिल एकोणिसशे अठ्ठयाऐंशी

•

मुद्रक : मा. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

# ऐरणीवरचे घाव

> भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र प्रदेशातील निवडक कार्यकर्त्यांचा अभ्यास वर्ग त्र्यंबकेश्वर येथे झाला. या वर्गात मा. दत्तोपंतजी ठेंगडी यांनी केलेल्या भाषणाच्या आधारावर खालील संकलन करण्यात आले आहे.

## पूर्वार्ध

येथे जमलेल्या बहुतेकांना मी ओळखतो. किमान ऐंशी टक्के कार्यकर्ते तरी असे आहेत की ज्यांना मी व्यक्तिशः जाणतो. या सर्वांना भारतीय मजदूर संघाची रीती, नीती, पद्धती काय आहे हे माहिती आहे. सर्वजण जुने व जाणते कार्यकर्ते आहेत. त्यांना नव्याने काही सांगण्याची गरज नाही. काही नवीन कार्यकर्ते देखील असतील, त्यांना देखील मजदूर संघाची रीती, नीती काय ? हे सांगण्याची आवश्यकता नाही. कारण ती सर्वांनाच माहिती असते.

**मनुष्य जीवनाची रीती, नीती**

मनुष्य जीवनाची जी रीती, नीती असते तीच संस्थेची असते. चांगले काय ? वाईट काय ? हे कोणाला कळत नाही असे नाही. वाईट काय हे कळत असते. तरी देखील चुकीचे व्यवहार होतात. ते अज्ञानामुळे होतात असे म्हणता येणार नाही. फार तर वनवासी लोकांबद्दल असें म्हणता येईल–बिचारे वनवासी आहेत, त्यांना कळत नाही. परंतु सुशिक्षित माणसाला कळत नाही असे म्हणता येणार नाही.

**सदा सत्य बोला**

सदा सत्य बोला, यथा तथ्य चाला ।
बरे बोलती लोक तेणे तुम्हाला ॥

इ. गोष्टी सहजच कळणाऱ्या आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय हेही सुशिक्षितांना माहिती आहे. तरी देखील चुका होतात. गडबडी होतात. त्या अज्ञानामुळे होत नाहीत. इतकेच काय पण स्मगलर-लाही स्मगलिंग ही गोष्ट चुकीची आहे हे कळतेच. आपला अकाउंटंट हा प्रामाणिक असावा अशी त्याची अपेक्षा असते. म्हणजे प्रामाणिकपणा हे चांगले जीवन–मूल्य आहे हे त्याला माहिती आहे.

स्त्री–पुरुष संबंधामध्ये अनैतिक व्यवहार करणारे लोक आहेत ते अज्ञानी आहेत, त्यांना कळत नाही असे म्हणणे चुकीचे होईल. अनैतिक व्यवहार करणाऱ्यांपैकी एकाही पुरुषास स्वतःच्या घरातील बहिणीशी वा पत्नीशी दुसऱ्याने अनैतिक व्यवहार केला तर रागच येईल. तो बाहेर शेण खात असेल, परंतु दुसऱ्या कोणी याच्याच घरात शेण खाण्याचे काम केले तर हा त्याला मारल्याशिवाय रहाणार नाही. म्हणजे बरे काय आणि वाईट काय हे त्याला चांगले कळते. परंतु,

" माझे मज कळो–येती अवगुण ।
काय करू मन आवरेना ॥

याच्यामुळे चुका होतात.

" जानामि धर्मम् न च मे प्रवृत्तिः
जानाम्यधर्मम् न च मे निवृत्तिः ॥ "

असे दुर्योधनाने म्हटले आहे. अशीच सामान्य जनांची स्थिती

असते. त्यामुळे भारतीय मजदूर संघाची रीती, नीती, पद्धती काय आहे हे माहिती नाही म्हणून चुका होतात, असे म्हणता येणार नाही.

**प्राथमिक प्रश्न**

भा. म. संघाचे काम करावे की करू नये हाच खरा प्राथमिक प्रश्न आहे. त्याचे कारण भा. म. संघाचे काम करणे हा एक मूर्खपणा आहे असे आपण म्हणतो. आणि ती गोष्ट खरी आहे. त्याचे कारण भा. म. संघाच्या कामातून आपणास व्यावहारिक लाभ काहीही नाही. अलीकडे सार्वजनिक जीवनामध्ये व्यक्तिगत लाभ काय ? व्यक्तिगत फायदा काय ? याच सार्वजनिक जीवनाच्या कसोटचा आहेत. या कसोटचांवर आपणास काहीही लाभ नाही. पहाटे पाच वाजल्यापासून रात्री एक वाजेपर्यंत आपण काम करतो. इतकी मेहनत जर राजकीय क्षेत्रात केली असती तर कोठल्या कोठे पोहोचलो असतो. आपल्याला पदे मिळाली असती, प्रसिद्धी मिळाली असती. पण भा. म. संघात यातील काहीही नाही. पद नाही, प्रतिष्ठा नाही, उलटपक्षी आपल्यातील एखादा राजकीय क्षेत्रात पुढे चालला तर भारतीय मजदूर संघ त्याची टांग खाली ओढतो. म्हणजे आपल्याला वर नेणे तर सोडाच, पण खाली ओढणे असेच प्रकार होतील. यात पैसाही मिळत नाही. काही लोकांना आपण मानधन देतो. पण त्याची कसोटी काय ? इतर कामगारांसाठी आपण म्हणतो की गरजेवर आधारित किमान वेतन मिळाले पाहिजे. पण ते आपल्या पूर्णकालिक कार्यकर्त्यांना देतो काय ? इतरांसाठी गरजेवर आधारित वेतन मिळावे म्हणून लढाई करणाऱ्याने स्वतः मात्र अर्धपोटी राहिले पाहिजे असा आग्रह आहे. भा. म. संघात पूर्णकालिक म्हणून काम करण्यापेक्षा

इतरत्र काम केले तर दहा पट लाभ होईल. इतकी त्याची योग्यता असते. परंतु तसे न करता येथे खस्ता खाणे म्हणजे मूर्खपणाच नाही काय ?

**त्याग म्हणजे काय ?**

त्यागाचा अर्थ लोकांना कळत नाही. त्याग म्हणजे केवळ स्वत: शारीरिक कष्ट सोसणे नव्हे. त्याग मानसिकही असतो. मी स्वत: ध्येयासाठी कष्ट करतो. मला दोनदा जेवायला मिळाले नाही, जेलमध्ये जावे लागले, कष्ट करावे लागले तरी चालेल. ते सहन करता येईल. परंतु खरा प्रश्न मानसिक स्तरावर येतो.

मी कुटुंबवत्सल आहे, मला बायको आहे, मुले आहेत. मुले समाजामध्ये रहातात. बायकोचा संबंध इतर महिलांशी येतो. कॉलनीतील अन्य महिलांकडे पाहून त्यांच्या साड्या कशा आहेत, त्यांच्याकडे कोणत्या वस्तू आहेत, तशा साड्या मला का नकोत, शेजारणीच्या नवऱ्यापेक्षा माझा नवरा मोठा आहे, मग मला तशी साडी का नको ? शेजारची मुले आपल्या घरात बसून टी. व्ही पहातात. मग माझ्या घरी टी. व्ही. का नको ? आणि लहान मुलाने विचारले की बाबा आपल्या घरात टी. व्ही. का नाही ? तर त्याला काही राणा प्रताप व शिवाजी महाराज यांचे नाव सांगून मुलाचे समाधान करता येणार नाही. हे जे मानसिक प्रश्न आहेत, तो एक त्यागाचाच भाग आहे हे पुष्कळदा लोकांच्या लक्षातच येत नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर भा. म. संघाचे काम करणे चुकीचेच आहे, पागलपणाचे आहे हे निश्चित. ते करावे की करू नये हाच पहिला प्रश्न आहे. त्यानंतर पुढचे प्रश्न आहेत.

**भा. म. संघातून सुट्टी नाही**

भा. म. संघाचे काम हाती घेणे सोपे नाही आमच्याकडे खेड्यात दोन लहान मुली खेळत असताना आपापसात भांडण झाले तर म्हणतात " खेळली तर खेळली, नाही तर टाक माझं गाडगं फुटलं, मी चालले घरी ". असे मजदूर संघाचे काम नाही. ते एकदा हाती घेतले की जीवनभर केले पाहिजे. भले त्यातून काही मिळो वा न मिळो.

**अजब शाळा**

एका उर्दू कवीने म्हटल्याप्रमाणे ही एक अजब शाळा आहे. इतर शाळा आणि ध्येयवादी कार्य यात फरक आहे. आपण शाळेत जातो. पहिलीत जातो, चौथी पास होतो. आपल्याला प्राथमिक शाळेतून सुट्टी मिळते. माध्यमिक शाळेत जातो, दहावी पास होतो. दहावीची परीक्षा झाली की माध्यमिक शाळेला सुट्टी मिळते. महाविद्यालयात जातो, पदवी संपादन करतो. पदवी संपादन केली की महाविद्यालयाला सुट्टी मिळते. म्हणजे आपला पाठ्यक्रम संपला की सुट्टी. पण ध्येयवादी कार्य " **ऐसी पाठशाला है, जिसने सबक सिख लिया उसे छुट्टी नही** " म्हणजे ज्याने हा धडा, सबक, पाठ्यक्रम पूर्ण केला आहे त्याला ध्येयवादी कार्याच्या शाळेतून सुट्टी नाही. त्याला आयुष्यभर याच शाळेत रहावे लागते. भा. म. संघ हे अशा प्रकारचे ध्येयवादी कार्य आहे. एकदा तुम्ही भा. म. संघाच्या शाळेत आला आणि जर का पास झालात तर या शाळेतून सुट्टी नाही. तुम्ही पास झालात की येथेच जीवनभर रहावे लागेल.

म्हणून भा. म. संघात प्रवेश करतानाच पूर्णपणे विचार करणे,

आपल्या जीवनाचा विचार करणे, आवश्यक आहे. कारण मनुष्य जीवन आपल्याला मिळालेले आहे, ही परमेश्वराने आपल्याला दिलेली ठेव आहे. पुढचे जीवन आपल्याला काय मिळेल, पुढे काय होईल हे आपल्याला माहिती नाही. पुढचा विचार करायचा नाही. आज हा जन्म मिळाला आहे, या जीवनात काय करायचे ?

आपल्याकडील भांडवलातून जास्तीत जास्त लाभांश मिळविणे हेच चांगल्या उद्योगपतीचे लक्षण आहे. परमेश्वराने दिलेले आपले जीवन हे भांडवल जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे उपयोगात आणेल तोच खरा पंडित होय. म्हणून भारतीय मजदूर संघाचा हा धंदा हाती घ्यावा की घेऊ नये ? याचा निर्णय प्रथम केला पाहिजे.

**आपणांस आयुष्यात काय हवे**

एका चांगल्या माणसाने असे म्हटले की बहुतेकांना आपल्या आयुष्यात काय मिळवायचे आहे हेच शेवटपर्यंत कळत नाही माझ्या लहानपणाची गोष्ट आठवते. मी लहान होतो. आमचे गाव लहान. मोठी माणसे गावी क्वचित यायची. एकदा काय झाले, शंकराचार्य गावात आले. त्यांचे शिष्य, त्यांची पाद्यपूजा, वगैरे गोष्टी आम्ही लांबून पहायचो. तेव्हा मनात विचार यायचा की आपण असे काही तरी झाले पाहिजे. काय थाट आहे ! काय बडे-जाव आहे ! काही दिवसांनी एका उद्योगपतीच्या नातेवाईकाचा मृत्यू झाला. म्हणून त्याच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी ते मोठे उद्योगपती आमच्या गावी आले. मोठी कार होती, त्यांचा तो थाट, गणवेषधारी सेवक, ड्रायव्हरचा सुंदर ड्रेस पाहून असे वाटले की त्यांच्यासारखे पैसेवाला झाले पाहिजे. तर आयुष्यात काही मजा आहे. पण नंतर काँग्रेसची चळवळ झाली. काँग्रेसचे एक नेते श्री. अभ्यंकर यांचा दौरा आमच्या गावात झाला. त्यावेळी मोठमोठ्या

कमानी गावात उभारल्या. त्यांचे स्वागत झाले, सभा झाली, मिरवणूक निघाली. सर्वांनी हार घातले. तेव्हा मला असे वाटले की आयुष्यात जर काही व्हायचे असेल तर या कॉंग्रेसच्या नेत्या-सारखे व्हावे. तीनही गोष्टी अलग अलग आहेत. पण ज्यावेळी जी गोष्ट चकचकीत दिसते तिकडे धावत जाणे हा मुलाचा गुणधर्म आहे. आकर्षक चेंडूकडे धावणे हा मुलाचा स्वभाव असतो. तसेच माणसाचे. जे जास्त आकर्षक तिकडे माणसे धावतात. त्यामुळे आयुष्याच्या शेवटपर्यंत आपल्याला नेमके काय हवे हेच नेमके लोकांना ठरविता येत नाही. जे आकर्षक असेल ते पाहिजे असे वाटते.

**एलिस इन् वंडरलँड**

इंग्रजीत एका लहान मुलीची गोष्ट आहे. तिचे नाव "एलिस इन वंडरलॅन्ड." या गोष्टीत एलिस नावाची एक छोटी मुलगी आहे. तिला आई बाजारात घेऊन जाते. बाजारातील गर्दीत तिची आईपासून ताटातूट होते. आणि एलिस गर्दीबरोबर एका रस्त्या-वर येऊन थांबते. बिचारी घाबरून जाते. आता आईची भेट कशी होईल? मी कशी घरी जाईन? असा तिला प्रश्न पडतो. तो रस्ता सुनसान असतो. ती रडायला लागते. त्या रस्त्यावर कोणीच भेटत नाही. इतक्यात तिला समोरून एक मांजर येताना दिसते. आपल्या सार्वजनिक जीवनात अलीकडे माणूस माणसाशी बोलत नाही. पण लहान मुलांच्या गोष्टीत मुले आणि प्राणी एकमेकांशी गप्पा गोष्टी करतात. या गोष्टीत एलिस त्या मांजरीला विचारते, "मनु मावशी, मला माझ्या घरचा रस्ता सांग." मांजरी तिला विचारते की, "तुझ्या घरचा रस्ता सांगेन, पण नेमका पत्ता काय? पत्ता सांगितलास की नेमका रस्ता मी तुला दाखवेन."

एलिस म्हणते, " हीच तर अडचण आहे. माझ्या घरचा पत्ता मलाच माहिती नाही. " मांजरी म्हणते, " जर तुला पत्ता माहिती नाही तर मी रस्ता कसा सांगू ? "

या गोष्टीचे सार असे की जगातील नव्याण्णव टक्के लोकांना जीवनात नेमके कोठे पोहोचायचे आहे याचा पत्ताच नसतो. त्यामुळे ते इकडे तिकडे फिरत रहातात. शोधत रहातात.

**मनुष्याच्या जीवनाचे ध्येय . . . सुख**

माणसाच्या जीवनाचे ध्येय ठरून गेलेले आहे. आपले प्राचीन ऋषी मुनी, महर्षी, द्रष्टे यांनी जीवनाचे जे ध्येय सांगितले आहे तेच अलिकडच्या सुधारकांनी, पुरोगाम्यांनी, क्रांतिकारकांनी, स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांनी सांगितलेले आहे. ध्येय सगळ्यांचे एकच आहे आणि ते म्हणजे " जीवनाचे ध्येय–सुख हेच आहे. " जीवनाचा सर्व प्रवास हा सुखाच्या दिशेने चालला आहे. जुने ऋषी व आधुनिक हिप्पी या दोघांचे मत एकच आहे. ते सुखाच्या शोधात आहेत. फक्त मार्ग बदलतात. सुखाच्या कल्पना वेगवेगळ्या असतात, इतकेच. जगात असा कोणीही नाही की ज्याला दुःख हवे आहे. तरीही प्रत्येकाच्या सुखाविषयीच्या कल्पना अलग अलग आहेत. आणि म्हणून मार्ग अलग अलग आहेत. त्यामुळे हा मार्ग चांगला की तो मार्ग चांगला ? हाच खरा प्रश्न आहे.

**सुखाचे प्रकार**

तात्कालिक सुख मिळेल ते खरे सुख असे काही म्हणतात यालाच उपभोग असे म्हणतात. ज्याचा तात्काळ अनुभव घेता येईल, त्याला सुख म्हणायचे असे म्हटले तर शारीरिक सुख हेच. तात्काळ सुख होय. उपभोग म्हणजेच खरे सुख या विषयाचे श्रेष्ठ

प्रणेते उमरखय्याम हे मानले जातात. त्यांनी म्हटले आहे की, "जीवन काय, सुख काय याची चर्चा वाह्यात लोकांना करू दे.' ते आपल्या प्रेयसीला, सखीला असे म्हणतात, की तू माझ्या बरोबर चल.

'Ah ! Come with old Khayyam, and let the wise.
To talk, for one thing is certain that life flies.
One thing is certain and the rest is lies.
The Rose that has once blown for ever dies ! '

स्वतःला शहाणे समजतात, त्यांना चर्चा करू दे. तू माझ्या बरोबर चल. एक गोष्ट खरी आहे आणि बाकी सगळे झूठ आहे. गुलाबाचे फूल हे उमलले आहे ते एकदाच उमलते, नंतर सदासाठी कोमेजून जाते हेच खरे आहे. तेव्हा चर्चा वगैरे या शहाण्या माणसांना करू देत. उपभोगाचे इतके सुंदर वर्णन इतरत्र कोठे नसावे. याच मनःस्थितीत उमरखैय्याम पुढे म्हणतात.

'Ah Love ! Come and fill up the cup that clears
Present from past regrets and future fears
Tomorrow, why tomorrow, I may be
One with Yesterday's seven thousand years !

सामान्य जणांना विचार हाच असतो. पण आपण अनेकांच्या जीवनाबद्दल विचार केला तर तात्कालिक सुखामुळे सुखी झालेले लोक दिसायचे नाहीत. उलट आपल्याकडे म्हटले आहे की,

न जातु कामः कामानाम् उपभोगेन शाम्यति
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते

उपभोगाने शांती झाली आहे, समाधान झाले आहे असे होत

नाही. अग्नीत तूप टाकल्याने तो शांत होण्याऐवजी उलट भडकतोच. त्याप्रमाणे उपभोगाने वासना अधिकच भडकतात. त्यामुळे मनुष्य समाधानाकडे जात नाही, असे अनेकांनी म्हटले आहे.

चिरंतन सुख कशात आहे ? हा पूर्वीपासूनचा सर्व विचारवंतांपुढे प्रश्न आहे. तात्कालिक सुख समजू शकतो. परंतु ज्यामुळे आयुष्याच्या शेवटी आपल्याला सुख वाटेल असे काही आहे का ? याबद्दल अनेकांनी अनेक प्रकारे विचार प्रगट केले आहेत.

समर्थांनी म्हटले आहे की,

जन्मा आलीयाचे सार्थक । करावे काही पुरुषार्थाचे कौतुक ।।
जेणे करता समस्त लोक । मस्तक डोलती ।।

उपभोगवादी विचार मनात येतात. ध्येयवादी विचार मनात येतात. पण शेवटी ठरवायला हवे की आपल्याला कोठे पोहोचायचे आहे. चिरंतन सुख कशात आहे ? चिरंतन म्हणजे जाणारे येणारे नाही. तात्कालिक नाही. तर स्थिर स्वरूपाचे.

**मित्राचे उदाहरण**

आमचे एक मित्र आहेत. त्यांना मधुमेह आहे. त्यांना मिठाई फार आवडते. ते पुढारी आहेत. तुम्ही त्यांना मिठाई दिलीत तर म्हणतील, " काय मूर्ख आहेस ? मला मारू इच्छितोस काय ? तुला माहीत आहे ना, की मला मधुमेह आहे. " त्यांनी असे म्हटल्यावर त्यांना असे सांगा, " ही नेहमीची बर्फी नाही. हा जरा निराळा नमुना आहे. आपण अशा प्रकारची मिठाई पूर्वी कधीच खाल्ली नसेल." ते म्हणतील, 'अच्छा, नवीन प्रकार आहे, मग द्या एखादा तुकडा.' असे म्हणून संपूर्ण डबा फस्त करतील. मनुष्याच्या मनात आंदोलने चालतात. मिठाई खाल्ली तर बरे वाटते. पण

इन्शुलीनचे इंजेक्शन घेताना तोंड वाकडे होते. पण वाटते असे की जे होईल ते होईल, आता खाऊन घ्या. तेव्हा अशा प्रकारची आंदोलने-- क्षणिक सुखापासून ते चिरंतन सुखापर्यंत सर्व विषयां-संबंधी आपल्या मनात येत असतात. तेव्हा प्रथम हे ठरविले पाहिजे की सुख कशात आहे. सगळयांना एकाच गोष्टीत सुख वाटेल असे नाही. प्रत्येकाला वेगवेगळ्या गोष्टीत सुख वाटेल. प्रत्येकाचा स्वभाव अलग आहे. आणि त्यामुळेच आपापल्या स्वभावाप्रमाणेच आपण हे ठरविले पाहिजे की पागलपणाचा, मूर्खपणाचा भा. म. संघाच्या कामाचा हा धंदा आम्ही करावा की करू नये ? आपला असा मुळीच आग्रह नाही की सर्वांनी भार-तीय मजदूर संघाचे काम करावे. आमची तर अशी जाहिरात आहे की " ज्याचे डोके बिघडले असेल त्यानेच भा. म. संघाचे काम करावे." शहाण्या माणसाने येऊ नये.

**प्रत्येकाची स्वतंत्र प्रकृती**

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी बातमी आली होती की यूनोच्या आमसभेत क्रुश्चेव्हने पायातील जोडा हातात घेऊन सर्वांना दाखविला. या कृतीवर इंटकमधील माझ्या मित्रांची प्रतिक्रिया फारच सौम्य होती. माझी प्रतिक्रिया मात्र अत्यंत तीव्र होती. क्रुश्चेव्हने जगाला जोडा दाखवला म्हणजे आमच्या राष्ट्रालाही दाखविला, हा आमचा अपमान आहे. हा जर इतका उन्मत्त असेल तर त्याला धडा शिकविलाच पाहिजे. जर धडा शिकविला नाही तर आपण जन्मलो याचा उपयोग काय ? आपल्या देखत आपल्या राष्ट्राचा जो अपमान करू शकतो त्याचा अपमानच केला पाहिजे. "

ही माझी प्रतिक्रिया इंटकमधील कार्यकर्त्यांना मूर्खपणाची वाटली

कोठे आपण, कोठे क्रुश्चेव्ह, कोठे युनो? सुखाने संसार करण्याऐवजी क्रुश्चेव्हचे गर्वहरण यात कसली मजा ? असे ते म्हणत. प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार सुखाच्या कल्पना, दुःखाच्या कल्पना बदलतात त्या अशा. त्यामुळे एखाद्या घटनेवर जी प्रतिक्रिया असते ती अलग अलग असेल आणि आपला निर्णय हा त्याप्रमाणे सुखकारक वा दुःखकारक होऊ शकेल

**लांडग्याची गोष्ट**

एका जंगलात एक सिंहीण व्याली. तिला दोन बछडे झाले. योगायोग असा की चुकून एक लांडग्याचे पिल्लू त्या दोघांच्यामध्ये सिंहिणीने सांभाळले. तिन्ही बछडे हळूहळू वाढू लागले. सिंहिणीचेच दूध तिघे पीत. खेळत बागडत. एकत्रित रहात. एके दिवशी सिंहिणीपासून तिन्ही बछडे जंगलात दूर गेले. समोरून एक मोठा हत्ती झुलत झुलत येत होता. ते पहाताच ते लांडग्याचे पिल्लू धावत धावत सिंहिणीकडे परत आले. आणि म्हणू लागले की "आई ते दोन भाऊ कसे वेडे आहेत पहा. समोरून एक मोठा प्राणी आला, तर त्याच्या अंगावर धावून जाण्याचा विचार करतात. मी चलाख, मी पळून आलो. त्या वेडयांना हे कळत नाही की आपला जीव कसा वाचवावा आणि सुखाने आरामात, आनंदात कसे रहावे." यावर सिंहीण म्हणाली, "बाळा, तू शूर आहेस, विद्याभ्यास केलेला आहेस. दिसायलाही सुंदर आहेस. पंडित आहेस. पण तू ज्या कुळात जन्मलास त्या कुळात हत्तीला मारत नाहीत." ती म्हणते.

"शूरोसि कृतविद्योसि दर्शनीयोसि पंडित
यस्मिन् कुले त्वमुत्पन्ने
—गजस्तत्र न हन्यते

त्यामुळे त्याचे भाऊ हत्तीला पाहून हत्तीकडे धावत गेले व त्याच्या गंडस्थळाकडे चढण्याचा प्रयत्न करू लागले. हा मात्र पळत आला व आईला म्हणू लागला, "ते मूर्ख आहेत. मी आपला शहाणा आहे" आणि म्हणूनच प्रत्येकाने ठरवावे की आपली नेमकी "वेव्ह लेंग्थ (तार) भारतीय मजदूर संघाशी जमते किंवा नाही, ती जमत असेल तरच हा पागलपणा करावा.

**ट्रेड युनियनमध्ये काम करण्याचे निरनिराळे हेतू**

ट्रेड युनियनमध्ये निरनिराळे लोक निरनिराळे उद्देश डोळ्यासमोर ठेवून काम करीत असतात. प्रत्येकाचे ध्येय अलग आहे, उद्दिष्ट अलग आहे. काही जण आपल्या पोटा पाण्याचा धंदा म्हणून या क्षेत्रात काम करतात. काही इतरत्र काही जमले नाही, हा बरा धंदा आहे, अशिक्षित गिरणी कामगार, त्यांचे पुढारपण सहज जमते म्हणून करतात. काही जरा हुशार आहेत ते राजकीय क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी एक पायरी म्हणून ट्रेड युनियनचा उपयोग करतात. तर काही जण क्रांती घडवून आणण्यासाठी एक हत्यार, क्रांतीचे शस्त्र म्हणून ट्रेड युनियनचे काम करतात.

आपल्यासारखे काही जण आहेत. त्यांचे ध्येय "परं वैभवं नेतुं एतत् स्वराष्ट्रम्" हे आहे. या ध्येयाची पूर्ती करण्याचे एक साधन म्हणून आपण ट्रेड युनियनकडे पहातो. थोडक्यात सगळे लोक एकाच ध्येयाने ट्रेड युनियनमध्ये काम करतात असे नाही. ज्याची जशी प्रकृती आहे त्या पद्धतीने तो विचार करतो आणि काम करतो. भा. म. संघाची रीती, नीती मात्र पूर्ण भिन्न आहे.

**भा. बडे भैय्यांचे उदाहरण**

१९७०–१९७१ ची गोष्ट असेल. बेंगलोरमध्ये एक बैठक चालू

होती. त्या बठकीत मी होतो. त्यावेळी एक आपले राजकीय पक्षात काम करणारे मित्र मला भेटावयास आले. भेट झाल्यावर त्यांना विचारले, " काय काम आहे ? " तर ते म्हणाले, " तुमची फॉर-मल परमिशन (औपचारिक परवानगी) घ्यायला आलो आहे. उत्तर प्रदेशात आमचे संविद (संयुक्त विधायक दल) झाले आहे आणि निवडणुकीत आम्ही मेजॉरिटीत आलो आहोत. सध्या मंत्री-मंडळ बनवण्याचा विचार चालू आहे. अन्य खात्यांचे वाटप झालेले आहे. खूप ओढाताणीने खाते वाटप झाले आहे. परंतु सर्व पक्षांचे एका खात्याचे बाबतीत ओढाताण न होता एक–मत झालेले आहे. सर्वांनी कॅबिनेट रँकमधील कामगार मंत्री म्हणून मा. बडे भैय्यांची एकमताने निवड केलेली आहे. सर्व पक्षांनी त्यास मान्यता दिली आहे. परंतु बडे भैय्या म्हणतात की तुम्ही ठेंगडीजींना विचारून या. आलेला राजकीय पुढारी मला म्हणाला," की मी बडे भैय्यांना म्हणालो की ठेंगडीजी नाही म्हणणार नाहीत. त्यांना आपला कार्यकर्ता कामगार मंत्री झालेला आवडेल. अशा गोष्टींना कोण नकार देईल ? तरीही बडे भैय्या म्हणतात की तुम्ही परवानगी आणाच, आणि म्हणून मी तुम्हास भेटावयास आलो आहे.

मी त्यांना म्हटले, " माफ करा, मी परवानगी देणार नाही. तुम्हाला असे वाटते का की भारतीय मजदूर संघ समाप्त व्हावा ? बडे भैय्यांना मंत्री करावयाचे नाही. " ते माझ्याकडे पहातच राहिले. हा मनुष्य पागलखान्यातून आला आहे काय ? ते म्हणाले, सगळ्या पक्षांच्या लोकांकडून बडे भैय्यांच्या नावास मान्यता मिळाली आहे. तुमची परवानगी मिळणारच असे मी सांगून आलो आहे. मी म्हटले, परवानगी मिळणार नाही. बोलणे येथेच संपले. ते परत गेले.

पण ते होते राजकारणी. चहाच्या वेळी पुन्हा भेटले आणि म्हणाले इतर लोकांना काय वाटेल ते जाऊ द्या. तुम्ही परवानगी दिली नाही तर बडे भाईंना काय वाटेल. आपला चान्स ठेंगडी-जींनी घालवला. मी त्यांना म्हटले 'मी जितका पागल आहे तितकेच बडे भाई देखील पागल आहेत.' पुढे काही काळानंतर लखनौला मी गेलो होतो. त्यावेळी हे सद्गृहस्थ पुन्हा भेटले. आणि मला प्रांजळपणे म्हणाले, 'आपली बंगलोर मध्ये भेट झाली. तेव्हा मला खरेच असे वाटले की ठेंगडीजी हे पागलखान्यातून आले आहेत. पण त्या पेक्षा आश्चर्य वाटले ते तुमची प्रतिक्रिया बडे भाईचे कानावर घातली तेव्हा बडे भाई म्हणाले, " मला तर ही गोष्ट पहिल्यांदाच माहिती होती. म्हणूनच मी तुम्हाला ठेंगडीजीं-कडे पाठवले."

बडे भाईची सुखाची कल्पना ही कामगार मंत्री होण्यामध्ये नव्हती. कामगार मंत्रिपद नाकारून भा. म. संघाचे काम करण्यात त्यांना सुख वाटत होते. प्रत्येकाची सुखाची कल्पना अशी अलग असते,

**सात्विक सुख**

गीतेमध्ये असे म्हटले आहे की—
यत्तदग्रे विषमिव परिणामे मृतोपमम्
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तम् आत्मबुद्धिप्रसादजम्

जे सुरुवातीला विषाप्रमाणे कटु पण शेवटी अमृताप्रमाणे गोड असते त्यासच सात्त्विक सुख म्हटले आहे. सुरुवातीस बायको रागवते. मुले म्हणतात आपल्या घरी टी. व्ही का नाही. तेव्हा आपल्या मनात येते आपण मूर्खपणा तर करीत नाही. असे हे सुख

सुरुवातीला विषाप्रमाणे आहे. त्यामुळे प्रत्येकाने प्रथम स्वतःबद्दल विचार करावा. नंतरच भा. म. संघाबद्दल करावा.

**एकाच परिस्थितीत दोन निर्णय**

एकाच परिस्थितीत अलग अलग कल्पना असू शकतात. राजा मानसिंग व महाराणा प्रताप एकाच परिस्थितीत होते. दिल्लीला अकबराचे शासन आहे. तो सर्वांना मांडलिक बनवू पहातो. राजा मानसिंग हुशार. त्याने पाहिले की एवढ्या मोठ्या सत्तेशी लढा देण्यापेक्षा वारा येईल तशी पाठ फिरवावी. त्यातच शहाणपणा आहे. त्याने मांडलिकत्व पत्करले. परंतु त्याच परिस्थितीत राणा प्रतापाने ही बुद्धिमत्ता दाखवली नाही. त्याने लढाई ओढवून घेतली. हळदी घाटाच्या लढाईत बावीस हजार लोक मारले गेले. महाल सोडून त्यास जंगलात जावे लागले. बायको व मुले यांची उपासमार झाली. मुलांना खायला द्यायला काही नाही. हे पहाण्याचा कटु प्रसंग राणा प्रतापावर आला. शहाणा माणूस असता तर मानसिंगाप्रमाणे अशा भानगडीत पडलाच नसता. राजा मानसिंगाला आराम मिळाला. राजेशाहीचा उपभोग घेता आला. राणा प्रतापाला दुःखाचा मार्ग स्वीकारणे सुखकर वाटले. तेव्हा एकाच परिस्थितीत प्रत्येकाच्या सुखाच्या कल्पनांनुसार दोन परस्पर विरोधी दृष्ये दिसतात. हा ज्याचा त्याचा स्वभाव आहे.

मी उदाहरण देतो की १५ ऑगस्ट १९४७ नंतर हिंदुस्थानातील लोक एकदम चतुर झाले. १५ ऑगस्टच्या सकाळपर्यंत लोक मूर्ख होते. १५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून लोक एकदम व्यवहार चतुर, हुशार बनले. त्यामुळे जीवनमूल्ये बदलली. पूर्वी जीवनमूल्ये वेगळी होती. लोक देशाकरता, समाजाकरता कष्ट सहन

करत. काही लोक साखर सोडत, काही गूळ सोडत. काही जेल मध्ये गेले. त्यामुळे व्यवसाय बंद पडला. परत आल्यावर खाण्याचा प्रश्न निर्माण झाला. काही बरबाद झाले. आपल्या संसाराची धूळधाण केली. लोक म्हणत हा श्रेष्ठ पुरुष आहे. काही फाशी गेले. त्या फाशी गेलेल्यापैकी एकाने एक कविता केली आहे. त्याचे नाव रामप्रसाद बिस्मील. सगळ्या कैद्यांना क्रमाक्रमाने फाशी देण्यात येणार होते. तर त्याने फाशी जाण्यापूर्वी कविता केली. ती अशी–

सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है
देख लेंगे जोर कितना बाजु के कातिल में है।
खींच कर लायी थी सब को कत्ल होने की उमीद
आशिकी का आज झमघट कुचा ए कातिल में है

स्वतःचे शिर काटून घेण्याची इच्छा आमच्या मनात आहे. या मारेकऱ्याच्या हातात किती जोर आहे तेच आम्हाला पहायचे आहे. आम्हा सर्वांना फाशी होणार या उमेदीनेच तर आम्ही येथे आलो आहोत. आणि त्यामुळे आज या मारेकऱ्याच्या गल्लीत आमच्या साऱ्या देशप्रेमींचा मेळावा भरला आहे.

अशा प्रकारची जीवनमूल्ये १९४७ पूर्वी होती. आता बदलली आहेत. आता कत्ल या जागी मंत्री शब्द येईल. आणि कवी म्हणेल

"खींच कर लाई थी सब को मंत्री होने की उम्मीद"

त्यामुळे आता जर प्राणांतिक उपोषण करायचे असेल तर लोक म्हणतात किती दिवस उपोषण केले तर नगरसेवक होईन. किती दिवस तुरुंगात गेलो तर आमदारकीचे तिकीट मिळेल. अशा प्रकारचे गणित मांडले जाते. हा नवीन जमाना आहे.

गीतेमध्ये भगवंतानी म्हटले आहे की कर्मफलाचा त्याग करावा. आता उलट प्रकार आहे. किती त्यागाचे किती फळ मिळेल, हा अलीकडचा जीवनविषयक विचार आहे.

केवळ लहान मुलाप्रमाणे चकाकणाऱ्या गोष्टीवर आसक्त होऊन चालणार नाही. बारकाईने विचार करावा लागेल. प्रसिद्धी फोटो इ. पासून दूर रहावे लागेल. असा आपला फोटो काढला गेला पाहिजे. हा जो विचार आहे त्यास इंग्रजीत एक शब्द आहे. " नार्सिसस कॉम्प्लेक्स "

**नार्सिसस कॉम्प्लेक्स**

ही ग्रीक पुराणातील गोष्ट आहे. नार्सिसस हा एक सतर अठरा वर्षांचा तरुण असतो. पूर्वी आरसे नव्हते. त्यामुळे त्याने स्वतःचे रूप कधी पाहिले नव्हते. आपला चेहरा त्याने कधीच पाहिला नव्हता. तो दिसायला अतिशय सुंदर होता. एकदा एका शांत निर्झरावरील ओंडक्यावरून तो निर्झर पार करीत होता. त्यावेळी त्याने खाली पाहिले. निर्झर शांत होता. त्यामुळे त्याला त्याचा चेहरा दिसला. आपला चेहरा पाहिल्यावर नार्सिसस इतका खूष झाला, इतका आसक्त झाला की आपले स्वतःचे स्वतःशीच मिलन व्हावे म्हणून तो झुरू लागला. स्वतःचे मिलन स्वतःशी कसे होईल ? ते शक्य नव्हते. त्यामुळे या मिलनाच्या विचारानेच तो झुरत झुरत गेला. म्हणून स्वतः स्वतःशीच आसक्त होणे याला इंग्रजीत " नार्सिसस कॉम्प्लेक्स " असा शब्द आहे हा कॉम्प्लेक्स पुढारी लोकांमध्ये असतो. आज येथे भाषण झाले की ते टेप केले आहे. 'लावा बरं' ऐकू दे मला माझा आवाज. फोटो काढला फोटो चांगला आला. पाहू दे मला माझा फोटो. हे जे 'दाखव बरं,' हा " नार्सिसस कॉम्प्पलेक्स " आहे.

**आता ते कोठे आहेत ?**

इंडिया टु डे मध्ये अलीकडेच एक लेख आला आहे. त्या लेखाचे हेडिंग आहे, " व्हेअर आर दे नाऊ " ? (आता ते कोठे आहेत? ) या लेखात १९७५ ते १९८५ पर्यंतच्या दशकात ज्या लोकांची नावे वर्तमानपत्रात नेहमी येत असत. पण आता कोठेही नाहीत अशाच लोकांबद्दल तो लेख लिहिला आहे. ते आता कोठे आहेत— तेव्हाची प्रसिद्धी कोठे आहे. देवकांत बारुआ, राजनारायण या मंडळींना मी जवळून पाहिले आहे. राजनारायण लोकसभेत बोलत. ते वीस मिनिटे बोलले. इंग्रजी वर्तमानपत्रात दोनच ओळी छापून आल्या. ते आमच्या समोर संपादकांना फोन करीत. आणि विचारीत " मी वीस मिनिटे बोललो. आणि तुम्ही दोनच ओळी छापल्या ? " इथपर्यंत त्यांची तयारी असे. आता कोठे आहेत ते! म्हणजे ज्यांना प्रसिद्धी हवी आहे त्यांनी दूरदृष्टीने विचार करायला हवा. खरी प्रसिद्धी कशात आहे. सुखाकडे जाणारे रस्ते कोणते आहेत, पैशाच्या मागे लागलेले लोक सुखी झालेत काय ?

**काकूंचे उदाहरण**

आमचे काका म्हणजे आमच्या वडिलांचे काका हे डे. इन्स्पेक्टर ऑफ स्कूलस होते. त्यांची बायको अशिक्षित. पण हुशार होती. नोकरी फिरतीची होती. काका फिरता फिरता एका खेड्यात गेले. तेथे त्यांना एक वनवासी मुलगा दिसला. त्याचे आयुष्य खराब होऊ नये म्हणून त्याला घरी घेऊन आले. आपल्या तीन मुलांबरोबर त्याचा सांभाळ करावा हा त्यांचा हेतू. आमच्या आजीस हे पटले नाही. तिच्या मते आजोबा मूर्ख, ती स्वत: व्यवहारचतूर पण करणार काय ? नाईलाजाने तिने त्यास घरात सांभाळले. परंतु लहान सहान गोष्टीत ती या वनवासी मुलास सापत्नभावाची

वागणूक देत असे. मुलांना खायला देताना या मुलास काहीतरी निमित्त सांगून बाहेर पाठवून द्यायची, आम्हास हे कळायचे. नंतर आमचा संबंध तुटला. पुढे हा वनवासी मुलगा मोठा झाल्यावर ऑफिसर झाला. दिल्लीस आला. मी एकदा त्यास भेटावयास गेलो. तेथे आजीला पाहिले. मी आजीस विचारले तू येथे कशी ? ती म्हणाली माझी तिन्ही मुले कृतघ्न झाली. मी विचारले झाले तरी काय ? त्यावर तिने उत्तर दिले की वेगवेगळी कारणे सांगून तिघेही मला टाळायला लागले. एक म्हणतो माझी खोली लहान आहे. दुसरा म्हणतो माझ्या बायकोची तब्येत ठीक नाही. तिसरा म्हणतो माझेच पैसे मला पुरत नाहीत. पण ज्याच्याशी पक्षपात केला त्याने मला स्मरणपूर्वक सांभाळले. वनवासी मुलगा म्हणाला ‘ ते काही का असेना, त्या माझ्याशी कशाही वागोत, त्यांनी मला सांभाळले म्हणून तर मी एवढा मोठा झालो. आमचे आजोबा मूर्ख आहेत असे आजी म्हणायची. स्वत:ला चतुर समजायची पण तिने जे स्वार्थाचे संस्कार मुलांवर केले त्याचा संकलित परिणाम हा झाला. त्यामुळे तिला असे म्हणावे की तुम्हीच यास जबाबदार आहात असे मला वाटले. परंतु तसे न म्हणता मी म्हटले’ जमाना बदलला आहे. ‘ पोरं लक्षच देत नाहीत. ’ पण खरोखरच असे का झाले ? त्यास आजीच कारणीभूत होती असे मला वाटते. त्यामुळे प्रत्येकाने सुखाच्या धारणेनुसार स्वत:चा मार्ग निश्चित करणे जरुरीचे आहे. परमेश्वराने आपल्याला दिलेले आयुष्य हे भांडवल आहे. त्याचा जास्तीत जास्त फायदा मिळविण्यासाठी जर भारतीय मजदूर संघाच्या “ वेव्ह लेंग्थ बरोबर ” आपल्या विचाराची वेव्ह लेंग्थ जुळत असेल तरच मजदूर संघाचे काम करावे. अन्यथा करू नये असे मला वाटते.

# उत्तरार्ध

काल आपण असे पाहिले की सुरुवातीस विषाप्रमाणे परंतु नंतर अमृत असेल असे जे सुख आहे ते सात्त्विक सुख होय. ते चिरंतन असते. अखंड (अक्षुण्ण) असते. घनीभूत असते. यास मोक्ष अशी तांत्रिक संज्ञा आहे. आमची सुखाची कल्पना तात्कालिक आहे की चिरंतन आहे यावर आम्ही भा. म. संघाचे काम करावे की करू नये हे अवलंबून आहे. आणि मी हे जाणतो की या ठिकाणी बसलेले सर्व कार्यकर्ते विचारपूर्वक, समजून उमजून, या सर्व गोष्टींची योग्य कल्पना मनात ठेवून, भा. म. संघाचे काम करू लागलेले आहेत. असा सर्व बाजूंनी विचार करून निर्णय घेतल्यानंतर मजदूर संघाच्या रीती, नीती, पद्धतीचा विचार आवश्यक ठरतो.

## हुकुमशाही की लोकशाही

आपल्या देशात लोकशाहीच्या नावाखाली बेशिस्त माजली आहे. वर्तमानपत्र उघडले की रोज याच बातम्या वाचावयास मिळतात. निरनिराळ्या संघटनांचा कारभार कसा चालतो हे आपणांस दिसते. लोकशाही याचा अर्थ अनुशासनहीनता असा अलीकडे घेतला जातो. आणि अनुशासन याचा अर्थ मात्र हुकुमशाही असाच घेतला जातो. आपल्या आजुबाजूचे वातावरण या विचारांनी भारित झालेले आहे. अन्य संघटनांमध्ये कौटुंबिक भावना ही कल्पना व्यर्थ समजली जाते. परंतु भा. म. संघाने कौटुंबिक संघटना यावर पूर्ण विश्वास ठेवला आहे. आपलेही

काही निर्णय कधी कधी हुकुमशाहीचे किंवा कधी कधी लोकशाहीचे वाटतात.

### भारतीय श्रमिक संघ

मजदूर संघाच्या स्थापनेसाठी आम्ही काही कार्यकर्ते नागपूरहून भोपाळकडे चाललो होतो. माझ्या डोक्यात नवीन संघटनेचे नाव "भारतीय श्रमिक संघ" असे ठेवावे असे असल्याने तशाच प्रकारांनी कागदपत्र टाईप केलेले होते. गाडीत नागपूरच्या कार्यकर्त्यांनी ते वाचले होते. त्यामुळे प्रत्यक्ष बैठकीत संघटनेचे नाव काय ठेवावे असा विचार पुढे आल्यावर काही जणांनी भारतीय श्रमिक संघ हे नाव सुचविले. परंतु यास उत्तर भारतातील अनेक प्रांतांनी विरोध केला. त्यांचे म्हणणे असे की "श्रमिक" या शब्दाचा उच्चार उत्तर भारतीय प्रांतामधून "शरमिक" असा केला जाईल. आणि हे चांगले नाही. माझ्या मनात तर 'भारतीय श्रमिक संघ" हेच नाव अभिप्रेत होते. बैठकीत बंगालचे वयोवृद्ध कार्यकर्ते श्री. बॅनर्जी उपस्थित होते. बंगालमध्ये श्रमिक हा शब्द लोकप्रिय असल्याने मला वाटले की बॅनर्जी हे "श्रमिक" हाच शब्द उचलून धरतील आणि उत्तर भारतीय कार्यकर्त्यांनी सुचविलेला मजदूर हा शब्द अमान्य होईल. म्हणून मी म्हटले की आपल्या सर्वात वयानी जास्त श्री. बॅनर्जी आहेत, ते जे सांगतील ते आपण मान्य करू. आश्चर्याची गोष्ट अशी की श्री. बॅनर्जी उभे राहिले आणि म्हणाले की 'आपल्याला एक मोठे कार्य, राष्ट्र कार्य करायचे आहे. तेव्हा प्रत्येकाने आपला शब्द पाहिजे असा आग्रह धरू नये. तेव्हा मी असे सुचवितो की आमच्या बंगालमध्ये "श्रमिक" हाच शब्द चालतो. तरी पण आपल्या पंजाबच्या बांधवांसाठी मजदूर संघ असेच नाव रहावे.' आता काय करणार !

मजदूर संघ हे नाव मान्य केले.

### उत्पादकतेशी जोडलेले वेतन

एकदा एका बैठकीत एका मित्रांनी प्रश्न उपस्थित केला. त्या-वेळी सगळीकडे उत्पादकतेशी जोडलेले वेतन या विषयावर चर्चा चालू होती. त्यामुळे वेतन जर उत्पादकतेशी जोडले तर उत्पादन वाढेल, देश भरभराटीस येईल म्हणून आपण सर्व राष्ट्रवाद्यांनी यास-मान्यता दिली पाहिजे. त्यावेळी मी म्हटले की "नाही. आम्ही या गोष्टीचे समर्थन करणार नाही. कारण यावर अंतिम निर्णय झाला आहे. त्यामुळे चर्चा वगैरे होणार नाही." लोकांना वाटले मी कम्युनिस्टांसारखा विचार करतो. संघटनेच्या ठर-विलेल्या नावात बदल देखील मी मान्य केला, तर येथे चर्चाही नाही. म्हणजे हा मनुष्य "मूडी" दिसतो. असे काही जणांना वाटेल.

परंतु आपल्याकडे 'अ' ला वाटले म्हणून 'हे' झाले, 'ब' ला वाटले म्हणून 'ते' झाले असे होणार नाही. तर त्यासाठी विचारांची एक निश्चित पद्धती आहे. हुकुमशाही, लोकशाही इ. बाबत एक विशेष अनुशासन आपणांकडे आहे.

### शिस्त....डिसिप्लिन

अनेकांना वाटते की डिसिप्लिन हा शब्द सैन्यातील आहे. परंतु तसे नाही. हा शब्द अध्यात्मातील आहे. तो डिसॅपल पासून आला आहे, डिसॅपल म्हणजे शिष्य, शिष्यत्व असा त्याचा अर्थ आहे. शिष्यत्वाच्या भावाचे सुंदर उदाहरण गीतेत आहेच. गीतेच्या सुरुवातीसच अर्जुनाच्या मनात संभ्रम निर्माण होतो. आणि तो भगवंताना म्हणतो,

" यच्छ्रेयःस्यात् निश्चितं ब्रूहि तन्मे ।
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वाम् प्रपन्नम् ॥ "
(अ. २ श्लोक ७)

मी तुमचा शिष्य आहे. लढायचे की लढायचे नाही याविषयी एक निश्चित आदेश द्या. भगवंतांनी तसे निश्चित उत्तर दिले नाही. उलट त्यांच्या मनातील एकेका शंकेचे समाधान करायला सुरवात केली. ज्या कारणांमुळे संभ्रम निर्माण झाला त्या कारणांची उत्तरे दिली. पण परिस्थिती अशी होती की एका शंकेचे विवरण भगवंतानी केले की त्या विवरणातून दहा शंका निर्माण झाल्या. मग त्या शंकांचे भगवंत विवरण करीत. असे होता होता १८ अध्याय झाले. शेवटी अर्जुनाने सांगितले की, " माझ्या मनातील सर्व मोह नष्ट झाले आहेत. आता मी निसंःदिग्ध झालो आहे. आता तू सांगशील ते मी करायला तयार आहे.

नष्टोमोहः स्मृतिर्लब्धा—त्वत्प्रसादान्मयाच्युत १८.७३
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥

आता तरी भगवंतानी सांगावे की नेमके काय करावे ? परंतु तसे न सांगता ' मी सांगितलेल्या सर्व गोष्टींचा सर्व बाजूंनी तू विचार कर ' आणि त्यानंतर तुझी जशी इच्छा असेल तसेच तू कर, असे श्री. भगवान श्रीकृष्ण म्हणतात. त्यांनी म्हटले—

— विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु । १८-६३

हीच आपली अनुशासनाची पद्धती आहे.

**समज वाढविणं**

जसजशी समज वाढत जाईल, तसतसे अनुशासन येईल असे आपले मत आहे. सैनिकशिस्तीने काम होणार नाही. व्यवहारिक

बंधनेही आहेत. आपल्यापैकी कोणी कृष्ण नाही आणि कोणी अर्जुनही नाही. आपण सगळे आहोत तसे आहोत. हे मान्य करायला मला वाटते हरकत नसावी. त्यामुळे जी समज अर्जुन व श्रीकृष्णात होती इतकी उच्च दर्जाची समज आपणांस येणार नाही. म्हणून मुख्य भावार्थ लक्षात घेऊन समज वाढवावी लागेल. कित्येकदा कार्यकर्त्यांची विचारांची पातळी सारखी नसेल तर मतभेद होतील. मतभेद निर्माण होणारच नाहीत असे नाही. एकापेक्षा जेथे जास्त डोकी आहेत तेथे मतभेद होणारच. परंतु ते एका अनुशासनात विशिष्ट पद्धतीचे अंतर्गत असायला हवेत. यासाठीच विचारांची पातळी उंचवावी लागेल.

**अखिल भारतीय निर्णय**

निरनिराळे निर्णय कसे होतात ? विशेषत: अखिल भारतीय निर्णय कसे होतात ? कित्येकदा एकाच निर्णयाबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांची प्रतिक्रिया अलग असेल. एखाद्या उद्योगात अखिल भारतीय स्तरावर इतर संघटनांबरोबर संपाचा निर्णय घ्यावयाचा आहे. ज्या ठिकाणी आपली संघटना मजबूत असेल आणि संपाचा संघटनात्मक फायदा होऊ शकतो तेथील कार्यकर्त्यांना वाटेल की संप झाला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी आपली संघटना मजबूत नाही, कमकुवत आहे त्या ठिकाणी संपाचा संघटनात्मक फायदा तर सोडाच परंतु मोठ्या प्रमाणावर शिस्तभंगाची कारवाई होऊन अनेक कार्यकर्त्यांची ससेहोलपट होण्याची भीती असते तेथे संप नको अशी प्रतिक्रिया असेल. त्यामुळे निरनिराळ्या ठिकाणी एकूण आपल्या स्थितीचा व घेतलेल्या निर्णयांच्या परिणामांचा संकलित विचार करूनच निर्णय घ्यावा लागतो. अशा वेळी संप करावा असे सांगितले असेल तर एखाद्या

ठिकाणी आपले कितीही नुकसान झाले तरी संप केला पाहिजे किंवा संप करू नये असा निर्णय झाला तर केंद्रीय नेतृत्व नेभळट आहे, त्यास काही कळत नाही, असे म्हणणे चूक ठरेल.

कोणताही निर्णय घेतला तरी त्याचे काही फायदे असतात, काही तोटे असतात. भगवंतानी म्हटले आहे सर्व कार्ये काही ना काही दोषांनी युक्त असतात. जसे अग्नी पेटविण्यापूर्वी धूर होतो, तसे कुठलाही निर्णय हा किती फायदेशीर आहे किंवा किती तोटयाचा आहे यासंबंधी संकलित विचार करूनच निर्णय घेतला जातो. अशावेळी पुढारी लोक दिल्लीत हवेत बसून निर्णय घेतात, इथे आमचे काय हाल होतात, त्रेधातिरपिट उडते हे त्यांना काय माहीत ? असे म्हणण्याची गरज नाही. या बाबतीत आपणांस शिस्त म्हणून वरचा निर्णय जसा असेल तसा पाळलाच पाहिजे. कारण वर निर्णय घेत असताना सर्वांगीण विचार करूनच निर्णय घेतला आहे अशी कार्यकर्त्यांची धारणा असली पाहिजे. यासच आपण विचाराची पातळी वाढविणे असे म्हणतो. अशी पातळी नसेल तर आपण संस्था चालवू शकणार नाही. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की आपल्या आजूबाजूची जशी परिस्थिती असते त्या परिस्थितीवरून आपण निष्कर्ष काढतो. याचवरून मतभेद आणि मनभेद यात फरक आहे.

**मतभेद आणि मनभेद**

मतभेद चालतील आणि ते परिस्थितीवर आधारित केलेल्या अंदाजावर अवलंबून असतात. प्रत्येकाचा अंदाज अलग अलग असेल. परंतु मतभेद आणि मनभेद यात मूलभूत फरक आहे. मनभेद हे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या स्थायी प्रेरणा काय आहेत यातून निर्माण होतात. दोन कार्यकर्त्यांची स्थायी प्रेरणाच अलग

अलग असेल तर मतभेद होतील. अन्यथा होणार नाहीत. ट्रेड युनियनचे काम करताना राजकारणात प्रवेश मिळावा म्हणून कामगार चळवळ ही पहिली पायरी आहे असा काहींचा उद्देश असतो. काही जण पुढारपण करण्याचे उद्देशाने आलेले असतात. काही जण एक चांगला धंदा आहे म्हणून येतात, तर काही क्रांतीचे शस्त्र म्हणून चळवळीकडे पहातात. मूळ उद्दिष्टच भिन्न असेल तर निर्माण होणारे मतभेद समजणे अवघड नाही. अशावेळी मनभेदच होतील.

### मूळ प्रेरणा एक, तरीही मतभेद

मूळ प्रेरणा एक असली तरी देखील मतभेद होऊ शकतात. कित्येकदा चांगल्या लोकात देखील मतभेद होतात. प्रत्येकाला बुद्धी आहे, प्रत्येकाची प्रकृती अलग आहे. त्यामुळे मतभेद होणार.

मतभेदाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पांडव.

त्यांच्याइतकी एकात्मता पुराणात दुसरी नाही. हे सर्व जण एकजीव होते तरीही त्यांच्यात मतभेद होत असत. प्रसंग द्रौपदी वस्त्रहरणाचा आहे. त्यावेळी पांडव एकजीव असूनही त्यांच्यात मतभेद झाले. युधिष्ठिर शांत होता. भीमाला राग आला. त्याने सहदेवाला म्हटले, ‘मला थोडा अग्नी आणून दे. मी आपल्या दादाचे हात जाळू इच्छितो. ज्या हाताने हा दादा द्यूत खेळला ते हात जाळून टाकू’ इतके कठोर मतभेद त्यांच्यात होते. याचा अर्थ असा नव्हे की द्रौपदीवर युधिष्ठिराचे प्रेम कमी होते आणि भीमाचे जास्त होते. तरीही त्यांच्या प्रतिक्रिया अलग अलग होत्या. परंतु मूलभूत प्रेरणा एक असल्याने पुढे ज्यावेळी युद्धाचा प्रसंग आला तेव्हा ते खांद्यास खांदा लावून लढले.

**उद्देश एक–आग्रह अलग–अलग**

एकच उद्दिष्ट असणाऱ्या अलग अलग व्यक्तींचा आग्रह अलग अलग असू शकतो. उद्दिष्ट एक असेल तरी त्यातील कोणत्या बाजूवर अधिक जोर द्यावयाचा याबाबत निरनिराळ्या व्यक्तींच्या प्रतिक्रिया अलग असतात. कुटुंबातील मुलीचे लग्न करावयाचे कुटुंबातील आणि अन्य सगेसोयऱ्यांचे मते तिचे वैवाहिक जीवन सुखी व्हावे, विवाह समारंभ उत्तम व्हावा, यावर एकमत असते. परंतु प्रत्येकाचा आग्रह अलग अलग असतो. संस्कृतात एक श्लोक आहे.

> कन्या वरयतेरुपम् माता वित्तम् पिताश्रुतम् ।
> बान्धवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नं इतरेजनाः ॥

मुलगी मुलाचे रूप महत्त्वाचे मानते, तर आई त्याची सांपत्तिक स्थिती चांगली असावी असे मानते. वडिलांची अपेक्षा तो खूप शिकलेला असावा अशी असते, तर नातेवाईकांना वर आपल्या जातीचा असावा असे वाटते. इतर लोकांचा जेवणासाठी पक्वान्न कोणते असावे यावरच जोर असतो. प्रत्येकाचा आग्रह अलग अलग गोष्टींवर असतो. सारांश, स्थूलमानाने, सर्वांचे ध्येय एकच असले तरी प्रत्येकाची प्राथमिकता, प्रत्येकाचा आग्रह अलग अलग असू शकतो. त्यामुळे असे म्हणण्याचे कारण नाही की कुटुंबात वेगवेगळे गट पडले आहेत. भांडणे आहेत. मतभेद आहेत. मनभेद आहेत. आग्रह अलग असले तरी असे होत नाही. याच धर्तीवर भा. म. संघामध्ये देखील निर्णय घेताना कोणाचा काय आग्रह आहे यावरून मतभेद होऊ शकतात. ते टाळण्यासाठी विचारांची शास्त्रीय पद्धत आपण निश्चित केली आहे.

**विचारांची शास्त्रीय पद्धत**

आपण एक खालीलप्रमाणे तक्ता तयार केलेला आहे. त्यावरून आपल्या विचारांची शास्त्रीय पद्धत तयार केलेली आहे. ती अशी—

**ध्येयवाद**
याच्या अनुषंगाने
⇓
**अंतिम उद्दिष्ट**
याच्या अनुषंगाने
⇓
**नजीकची उद्दिष्टे**
याच्या अनुषंगाने
⇓
**धोरण**
याच्या अनुषंगाने
⇓
**व्यूहरचना / रणनीती**
याच्या अनुषंगाने
⇓
**डावपेच**
याच्या अनुषंगाने
⇓
**कार्यक्रम**

असा हा तक्ता आहे.

कार्यक्रम काय व्हावेत, मतभेद होतील — अनेक होतील. कार्यक्रम आज करायचा की उद्या, कार्यक्रमाचे अध्यक्ष कोण वगैरे मते असतील. परंतु ते सर्व मतभेद हे निश्चित केलेल्या डावपेचांचे अंतर्गतच व्हावयास हवेत. डावपेच ठरविताना देखील जे मतभेद होतील ते मतभेद जी निश्चित केलेली व्यूहरचना असेल त्या

व्यूहरचनेच्या अंतर्गतच झाले पाहिजेत. म्हणजे दुसऱ्या युनियन बरोबर जाताना झेंडे बरोबर घेऊन जावेत की घेऊ नयेत, घोषणा कोणत्या द्याव्यात, अध्यक्ष त्यांच्या युनियनचा असावा किंवा आपला इ. बाबत मतभेद होऊ शकतील. परंतु हे सर्व मतभेद आपण नेमके धोरण काय निश्चित केले आहे यास अनुसरूनच चर्चा झाली पाहिजे.

धोरण काय ठरवावयाचे हे नजिकची उद्दिष्टे काय ठरविली आहेत त्यावर अवलंबून आहे. येथपर्यंत चर्चेला वाव आहे. निरनिराळ्या स्तरांवर मतभेदांना वाव आहे. याबाबत कोणतीही चर्चा होऊ शकते. परंतु **ध्येयवाद काय असावा यावर चर्चा होणार नाही**. कारण सरळ आहे. तुला आमचा ध्येयवाद मान्य नसेल तर तू कितीही कर्तृत्ववान, बुद्धिमान असशील तरी आम्हांस तुझी गरज नाही. इथे मतभेद नाहीत. आम्हाला तुझा उपयोग नाही. आमच्या सारख्या लहान माणसात तू येऊ नकोस. ध्येयवादाच्या प्रकाशात आमची अंतिम उद्दिष्टे निश्चित आहेत. भारत देश वैभवसंपन्न करणे हे आमचे अंतिम उद्दिष्ट राहील. ते ज्याला पसंत नाही त्याचे आम्ही स्वागत करणार नाही. इतकेच काय, भारतीय मजदूर संघ राहो अथवा न राहो आमच्या अंतिम उद्दिष्टांबद्दल चर्चा होऊच शकत नाही. म्हणजेच ध्येयवाद आणि अंतिम उद्दिष्टे याबाबत चर्चेला मुळीच वाव नाही.

ध्येयवाद आणि अंतिम उद्दिष्टे यांच्या अनुषंगाने नजिकची उद्दिष्टे, त्यांच्या अनुषंगाने धोरण, त्यानंतर व्यूहरचना, त्यानंतर डावपेच, त्यानंतर कार्यक्रम इ. बाबत चर्चा होऊ शकते. मतभेद होऊ शकतात. चर्चेला पूर्ण वाव. काही गोष्टी अशा आहेत की जेथे चर्चेला वाव नाही.

ध्येयवादाविषयी तडजोड नाही. अंतिम उद्दिष्टांविषयी तडजोड नाही. चर्चा नाही. नजीकची उद्दिष्टे काय ? या बाबत थोडीशी चर्चा होऊ शकते. फार नाही ! ती एकदा निश्चित झाली की त्याला अनुसरूनच धोरण काय असावे ? याबद्दल मोकळेपणाने चर्चा होऊ शकते. धोरण एकदा निश्चित झाल्यावर त्याच्या अनुषंगानेच व्यूहरचनेबद्दल मुक्त चर्चा होऊ शकते. एकदा व्यूहरचना निश्चित झाली की तिच्या अंतर्गतच डावपेच काय असावेत आणि कार्यक्रम काय असावेत यावर खुली चर्चा होईल. आपली लोकशाहीची आणि निर्णय घेण्याची ही पद्धती आहे. याबाबत थोडा अधिक विचार करू.

**आपला ध्येयवाद**

खरे म्हणजे आपला ध्येयवाद काय आहे हे सर्वांना माहीत आहे. प्रत्येक व्यक्तीचा सुखाचा मार्ग अलग आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या मार्गाने सुख मिळविता आले पाहिजे. प्रत्येक व्यक्ती सुखी झाली पाहिजे. संपूर्ण जगाचे हित व्हावे, हा आपला ध्येयवाद आहे. याचे वर्णन निरनिराळ्या प्रकारांनी होऊ शकते. ज्ञानेश्वरीतील पसायदानात हेच सांगितलेले आहे.

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणीजात ।।

आपल्या राष्ट्रीयत्वाचा प्रारंभ हाच मुळी विश्वसंस्कृतीचा प्रारंभ होय. आपले राष्ट्रीयत्व आणि विश्वकल्याण या दोन्हींचा विचार नेहमीच आपल्याकडे होतो. त्याचे कारण म्हणजे आपले राष्ट्र हेच पहिले सुसंस्कृत राष्ट्र होते. म्हणून विश्वकल्याणासाठी

योग्य भूमी कुठली असेल तर ही "भारत भूमी" सगळे लोक हेच मानतात. प्रत्येक विचाराला कोणता ना कोणता पाया आवश्यक असतो. म्हणून विश्वकल्याणाचा पाया हा भारतभूमीच होऊ शकते. असा आपला दृढ विश्वास आहे.

**ध्येयवादाचा मूलाधार**

प्रत्येक विचाराला कोणता ना कोणता मूलाधार (बेस ऑफ ऑपरेशन) आवश्यक असतो. आणि विश्वकल्याणासाठी मूलाधार केवळ भारत भूमीच होऊ शकते. हे जसे आपले म्हणणे आहे तसेच इतरांचे देखील आहे.

शिवाजीमहाराजांना भारतात हिंदवी स्वराज्याची स्थापना करावयाची होती. संपूर्ण भारताचे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर होते. परंतु त्यासाठी त्यांनी मूलाधार—कर्मभूमी म्हणून महाराष्ट्राची निवड केली. जोसेफ मॅझिनीच्या समोर संपूर्ण इटली स्वतंत्र करणे हे ध्येय होते. त्यासाठी त्याने फिडमाँट स्टेट हे मूलाधार म्हणून निवडले. कार्यक्षेत्र संपूर्ण इटली. पण मूलाधार मात्र फिडमाँट स्टेट. त्याचप्रमाणे बिस्मार्कला जर्मनी हे राष्ट्र सर्वश्रेष्ठ, सामर्थ्यवान करावयाचे होते. परंतु या गोष्टीची सुरुवात त्यांनी प्रशियातून केली. प्रशिया हा मूलाधार करून पुढे त्यांनी जर्मनीला सामर्थ्यवान बनविले.

याच धर्तीवर भारतभूमी आपल्या दृष्टीने मूलाधार आहे. परंपरेने, वारसा हक्काने आपण असे म्हणू शकतो की विश्वकल्याणाचा मूलाधार म्हणून भारत राष्ट्र परमवैभवाला न्यायचे आहे. हे आमचे अंतिम गंतव्य "अल्टिमेट्-गोल" आहे. त्याबाबत कोणतीही तडजोड चालणार नाही. यासाठी कोणी म्हणेल की मजदूर संघात हिटलरशाही आहे तर ते आम्हांस चालेल. हे चांगले प्रमाणपत्र आहे असे आम्ही म्हणू.

**अंतिम उद्दिष्ट कसे साधणार ?**

आमचे अंतिम उद्दिष्ट भारत देश वैभवसंपन्न करणे हे आहे. हे आम्ही कसे साध्य करणार ? देशाची रचना चांगली असावी, समाजव्यवस्था चांगली असावी, म्हणजे कशी असावी यासाठी आपल्या परंपरेला, संस्कृतीला धरून आजच्या परिस्थितीत विचार करणे आवश्यक आहे. परिस्थितीच्या संदर्भात परंतु संस्कृतीला धरून आम्ही विचार करू इच्छितो.

आम्हांस परिवर्तन करावयाचे आहे. देशामध्ये, समाजामध्ये परिवर्तन करावयाचे तर ते **परिवर्तन सरकारमार्फत होणार नाही** अशी आमची धारणा आहे. अन्य सर्वांना असे वाटते की जे काही परिवर्तन घडवून आणावयाचे आहे ते सरकारमार्फतच घडवावयाचे आहे. १९४७ सालानंतर सर्वांनी म्हटले की जे काही परिवर्तन घडायचे ते सरकारमार्फत घडवू. परंतु हे चुकीचे आहे.

त्याचे कारण जबाबदारी व अधिकार हे समकक्ष असावे लागतात. एखाद्यावर जितकी जबाबदारी द्यावयाची तितक्या प्रमाणात अधिकार द्यावे लागतात. तरच तो जबाबदारी पार पाडू शकतो. सरकारने संपूर्ण राष्ट्राचे पुनर्निर्माण करावे असे म्हटले तर सरकारला सर्वाधिकार द्यावे लागतील. सर्व जबाबदारी सरकारची तर सर्व अधिकारही सरकारचेच. अशा परिस्थितीत सरकार तानाशाही करीत आहे, हुकूमशाहीकडे झुकते आहे असे म्हणण्याचा आम्हाला नैतिक अधिकार नाही,

आम्ही सर्वाधिकार सरकारला देऊ इच्छीत नाही. कारण असे अधिकार प्राप्त झाल्यावर ते राष्ट्र निर्माण करतील की स्वतःचे वैभव निर्माण करतील हे सांगणे कठीण आहे. आपल्या देशात

राजर्षी झाले आहेत. जगातही झाले आहेत. पण राजर्षी फार थोडे असतात. असे म्हणतात की सत्ता भ्रष्ट होते, सर्वंकष सत्ता सर्वार्थाने भ्रष्ट होते. (पॉवर करप्टस्, ॲबसोल्युट पॉवर करप्टस् ॲबसोल्युटली) यामुळेच सरकारच्या भरवशावर राष्ट्र निर्माण झाले असे कोठेही आढळत नाही. जगाच्या इतिहासात कुठेही हे चित्र दिसत नाही.

**राष्ट्रनिर्माणाची आपली प्रक्रिया**

आपल्या परंपरेच्या आधारावर राष्ट्रनिर्माणाची काही पद्धती सांगण्यात आली. त्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे "सर्वसाधारण नागरिकांची राष्ट्रीय चेतना." अशा राष्ट्रीय चेतनेने युक्त अशी जन संघटना-मास ऑर्गनायझेशन—समाजातील निरनिराळ्या गटांचे हितसंबध अलग अलग असतात. त्यामुळे अलग अलग जन संघटना उभ्या रहातील. असे जनसंघटन हे नित्य–सिद्ध राष्ट्रवादी जनसंघटन असेल. ते निरनिराळ्या लोकांचे झालेले असेल. त्यामुळे स्वाभाविक रूपाने देशामध्ये एक नवीन नेतृत्व निर्माण होईल. ज्याला 'मॉरल लीडरशिप ऑफ द कंट्री' देशाचे नैतिक नेतृत्व असे म्हणतात.

**देशाचे नैतिक नेतृत्व**

देशाचे नैतिक नेतृत्व असे असेल की ज्यांच्या हाती आर्थिक सत्ता नाही, राजकीय सत्ता नाही, जे निस्वार्थी आहेत, समाजाविषयी ज्यांच्या मनात प्रेम आहे.

अयंनिजो परोवेत्ति गणनांलघुचेतसाम् ।
उदारचरितानांतु वसुधैव कुटुंबकम् ॥

हा तुझा, हा माझा, असा भेदभाव नाही. संपूर्ण मानव जाती,

संपूर्ण राष्ट्र माझे अशी भावना आहे. अशा प्रकारचे नैतिक नेतृत्व यातून निर्माण होते.

**वरती नैतिक नेतृत्व-खाली जनसंघटन-मध्ये शासन**

अशा नैतिक नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली आणि जनसंघटनेच्या आधारे आपल्याला निरनिराळ्या गोष्टी घडवून आणण्यासाठी यामध्ये शासन संस्था असायला हवी. तरच ती गडबड करणार नाही. आणि जरी शासनसंस्थेने गडबड केली तरी तिला दूर फेकण्याची ताकद जनतेत राहील. ही आपली राष्ट्र निर्माणाची कल्पना आहे. परंपरागत कल्पना आहे. शासन हे सर्वहारा होऊ नये, त्यावर अंकुश असावा अशी आपली कल्पना आहे.

**जनसंघटनेची चार कामे**

राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात जनसंघटना महत्त्वाची भूमिका बजावू शकते. जनसंघटनेची जी महत्त्वाची कामे आहेत ती खालीलप्रमाणे

(१) आपल्या सदस्यांच्या हिताचे रक्षण करणे. हे स्वाभाविक काम.

(२) आपल्या सर्व सदस्यांच्या सर्व शक्तीचा उपयोग राष्ट्र निर्माण करण्यासाठी करणे.

(३) सरकार चांगले काही करत असेल तर त्याला मदत करणे आणि वाईट करत असेल तर त्यास विरोध करणे.

(४) देशात सरकार हे एकमेव शक्तिकेंद्र झाल्यास त्यातून निरनिराळ्या आपत्ती येऊ शकतात. म्हणून वैकल्पिक शक्तिकेंद्र म्हणून काम करणे.

ही चारही कार्ये कोणत्याही जनसंघटनेकडे येतात. शासन हे मधे असेल अशा जनसंघटना आपल्याला सर्व क्षेत्रात उभ्या

करायच्या आहेत. तरच शासनात येणाऱ्या विकृती टळू शकतील आणि सर्वसंपन्न राष्ट्र निर्माण होईल.

जनसंघटना ही शासनावर अंकुश म्हणून राहील. कोणी तरी मला म्हटले की आपण सत्तेत का नसावे ? मी त्यास म्हटले की मी तुला अंकुश व्हायला सांगतो आहे आणि तू हत्ती व्हायचे म्हणतो आहेस ? तू अशी इच्छा का करतोस ? तेव्हा जनसंघटनेचे कार्य अंकुशासारखे, नैतिक नेतृत्वाचे कार्य माहुतासारखे व शासन संस्था ही हत्तीसारखी तरच शासन संस्था व्यवस्थित चालेल. हाच अनुभव जगाच्या इतिहासाचा आहे.

**नजिकचे उद्दिष्ट भा. म. संघ**

आमचे उद्दिष्ट–शॉर्ट रेंज ऑबजेक्टिव्हज् – मध्ये भारतीय मजदूर संघ आहे. नित्य–सिद्ध, राष्ट्रवादी, जनसंघटन ही जी आपली कल्पना आहे त्यातील एक भाग म्हणजे भारतीय मजदूर संघ होय. भारतीय मजदूर संघाच्या नावाबद्दल आमच्या मध्ये संस्थागत अहंकार नाही. भा. म. संघाकडे आम्ही केवळ राष्ट्र निर्माणाचे साधन म्हणूनच पहात असतो. ज्यातून राष्ट्र निर्माण होईल, गरिबांचे कल्याण होईल यासाठी कामगार चळवळ अशी आपली धारणा आहे.

म्हणूनच आपण सुरुवातीपासूनच भारतीय मजदूर संघाच्या स्थापनेपासून अशी भूमिका घेतली की सर्व मजुरांची मिळून एकच एक केंद्रीय युनियन असावी. परंतु तसे होत नाही. कारण अन्य लोक–पोलिटिकल युनियनाझिम् – राजकीय हेतूने प्रेरित कामगार चळवळ करतात. इतरांनी राजकीय हेतू सोडला तर सर्वात प्रथम भा. म. संघ एकीकृत संघटनेत विलीन व्हायला

तयार होईल. तेव्हा भा. म. संघ या नावाची अलग संघटना असावी, असे अलग अस्तित्व ठेवावे की एकच गैरराजकीय निखळ कामगार संघटना – ( जिनाईन ट्रेड युनियन) असावी यावर चर्चा होऊ शकते. परिस्थितीला अनुसरून निर्णय घेता येतील. परंतु नित्यसिद्ध राष्ट्रवादी मजदूर संघटन यांविषयी मात्र तड-जोड नाही. चर्चा नाही. लोकशाही नाही. हे निर्माण व्हायलाच हवे.

**आमचे धोरण**

वर उल्लेख केलेल्या नजिकच्या उद्दिष्टांच्या अंतर्गत आमचे धोरण काय असावे याबाबतीत विचार होऊ शकतो. वरील तीनही गोष्टींच्या प्रकाशातच धोरणाविषयी चर्चा, मतभेद होऊ शकतात. त्याच्या अनुषंगाने जेवढे मतभेद होतील तेवढेच अभिप्रेत आहेत.

धोरण दोन प्रकारचे असते. एक–बाह्य गोष्टींविषयी आणि दुसरे अंतर्गोष्टीविषयी. बाह्य गोष्टी अनेक आहेत. बाह्य गोष्टी सापेक्ष असतात. एक्सटर्नल ऑबजेक्टिव्ह आणि इंटर्नल सबजेक्टिव्ह बाह्य परिस्थिती सापेक्ष व अंतर्गत संघटनात्मक परिस्थती निर-पेक्ष अशी ही धोरणे आहेत. आपले औद्योगिक संबंधाविषयी काय मत आहे ? संपूर्ण राष्ट्रीयीकरण की मुक्त अर्थव्यवस्था? आपले म्हणणे काय ? हा बाह्य धोरणाचा भाग आहे. सरकारविषयी आपले धोरण काय असावे ? सहकार्य असावे की असहकार करावा नेहमी संघर्ष असावा की असू नये ? मजुरांच्या संबंधित टेक्नॉ-लॉजी–तंत्रज्ञान हा प्रश्न आहे. याबद्दल भा. म. संघाचे मत काय? देशाचे प्लॅनिंग–नियोजन कसे असावे ? या सर्व बाह्य गोष्टी आहेत. यासंबधी विस्तृत चर्चा होऊ शकते.

परंतु संघटनात्मक धोरण काय असावे ? याबाबत आमचे एक वैशिष्टय आहे. संघटन वाढवावे, मजबूत असावे, सर्व गोष्टींचा वापर संघटनात्मक शक्ती वाढविण्यासाठीच करावा, अशी आपली कल्पना आहे. कामगार संघटनेस अनेक गोष्टी करावयाच्या असतात. प्रचार करावयाचा असतो. आंदोलने करावयाची असतात. या सगळयात संघटन महत्त्वाचे आहे. नित्यसिद्ध राष्ट्रवादी शक्ती महत्त्वाची आहे. संघर्ष करायचा, समन्वय करायचा परंतु या दोन्हींचा उपयोग संघटना वाढविण्याकरताच व्हायला पाहिजे.

आधी थोडे संघटन, त्याच्या आधारावर संघर्ष, त्यातून माणसे मिळतील. थोडे अधिक संघटन, त्याच्या आधारावर तीव्र संघर्ष, त्यातून अधिक संघटन, मजबूत संघटन ही आपली पद्धती आहे. संघटन–संघर्ष, संघटन–संघर्ष संघटन वाढविणे ही आपली रचना आहे. तीच गोष्ट संपर्काबाबत. संघटन संपर्क, संघटन–संपर्क संरचना–संघटना. **थोडक्यात मुख्य गोष्ट नित्यसिद्ध राष्ट्रवादी संघटना वाढविणे**. त्यासाठी हे सगळे करायचे. आपण यासच महत्त्व देतो.

अलीकडे या गोष्टीस लोक महत्त्व देत नाहीत. अन्य लोक म्हणतात, संघटनेची काय आवश्यकता आहे. संघटना हा सोळाव्या शतकातील विचार आहे. आता मॉडर्न टेकनिक्स्–आधुनिक तंत्र आले आहे. संघटनेवर काम चालत नाही. हल्ली हवेवर काम चालते. एका वेळी एक हवा निर्माण होते. लाट येते आणि त्या लाटेवर सर्व कामे चालतात, असे लोक म्हणतात. आम्ही हे ऐकून घेतो. परंतु आमचा यावर विश्वास नाही. आमच्या दृष्टीने संघटन याच विषयाला सर्वात अधिक महत्त्व आहे.

**संघटनेचे नेतृत्व**

आपणांस संघटनेसाठी निरनिराळ्या ठिकाणी नेतृत्व उभे करावयाचे आहे. हे नेतृत्व योग्य असले पाहिजे. ह्या योग्यतेसंबंधी आपल्या नेमक्या कसोटया काय आहेत? या बाबत मी नेहमी महमंद साहेबांचे उदाहरण देतो. त्यांनी सांगितले होते की, ज्याल. लीडर– नेता बनायची इच्छा आहे त्याला लीडर करू नका आणि अशा माणसाला नेता करा की ज्याला नेता बनायचे नाही. आपण हा दंडक मनात ठेवला आहे. भा. म. संघ तुटला तरी चालेल पण ज्याला नेता बनायचे असेल त्याला नेता बनवायचे नाही. ही नेतृत्वाची कसोटी आम्ही ठरविली आहे.

आपण ज्या आखाडयातून येतो, तिथे बऱ्याच गोष्टी आपण शिकतो. कर्तृत्ववान माणसे पुढे पुढे करीत नाहीत. आणि बाहेरचे पुष्कळ लोक असे असतात की त्यांना पुढे पुढे करण्याचे जमतेच. कर्तृत्व कमी जास्त असेल. जर एखादा फोटो घेण्याचा प्रसंग असेल तर त्याला उभे रहाता आले नाही तरी तो डोके तरी पुढे काढतो. आपला पूर्ण फोटो नाही तर नाही किमान डोक्याचा तरी फोटो काढला जावा. या सगळ्या क्लृप्त्या माहिती असूनही न करणे हे आपल्या आखाड्याचे वैशिष्टच आहे. त्यामुळे ध्येयवादी माणसे स्वतःला पुढे पुढे करीत नाहीत. आणि जे स्वतःला नेता म्हणून पुढे आणू इच्छितात त्यांच्या ध्येयवादाविषयी शंका येते. असे प्रसंग वारंवार येतात. म्हणून याबाबतीत आपण अधिक काळजीपूर्वक असले पाहिजे.

**नेतृत्वाच्या कसोटया**

भा. म. संघाच्या दृष्टीने नेतृत्वाच्या कसोटया कोणत्या ? याचे उत्तर असे की पहिली कसोटी ही अॅबिलिटी–कर्तृत्व–नसून विश्व-

सनीयता–क्रेडिबिलिटी–डिपेंडिबिलिटी– ही राहील. संघटनेच्या दृष्टीने विश्वसनीयता ही महत्त्वाची बाब आहे. या बाबतीतील मला एक उदाहरण आठवते. जुन्या मध्य प्रदेशात ज्यावेळी काँग्रेस संघर्षामध्ये होती त्यावेळी सर्वात कर्तृत्ववान पुरुष म्हणजे टी राघवेंद्रराव हे होते. त्यामुळे काँग्रेसचा सर्व कारभार त्यांच्या घरातूनच चालायचा. पण इंग्रज सरकारला हे माहिती होते की गृहस्थ तत्त्वनिष्ठ नाहीत. तर हा माणूस खरीदण्याजोगा आहे. अंगावर नेहमी खादीचा वेष, स्वदेशीचे भाषण. तरीही इंग्रज सरकारने त्यांना गर्व्हनर केले. एका रात्रीत गर्व्हनर झाले. आणि गर्व्हनरच्या बंगल्यात खादीच्या वेषातच रहायचे. नंतर झालेल्या १९३० ते १९३२ सालच्या चळवळी दडपून टाकण्याचे काम यांनीच केले. आणि ते देखील खादीच्या वेषात राहूनच केले. थोडक्यात कर्तृत्व मोठे पण विश्वसनीयता नाही.

दुसरे नाव सी. पी. रामस्वामी अय्यर यांचे. त्यावेळी जे पुढारी रिंगणात होते त्या सर्वांनी हे मान्य केले की सी. पी. रामस्वामी यांच्या इतका दुसरा कोणी बुद्धिमान नाही. अगदी पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल हे देखील त्यांचेपेक्षा कमी. त्यावेळी काँग्रेसमध्ये अनेक बुद्धिमान लोक होते. आता तर काय प्रश्नच नाही ! रामा स्वामी हुषार होते, बुद्धिमान होते. पुढे त्यांना मद्रासचे "होम मेंबर" करण्यात आले. अतिशय बुद्धिमान असूनदेखील आंदोलनाने नंतर त्यांना पुढारी केले नाही.

ध्येयवादी माणूस कधीही आपली प्रतिष्ठा सोडीत नाही. प्रतिष्ठा सोडणे याचा अर्थ तात्कालिक यश प्राप्त करण्यासाठी, छोटचा मोठ्या क्लृप्त्या योजणे होय. ज्याला आपण हातखंडे म्हणतो. म्हणून हे पाहिले पाहिजे की भा. म. संघाची प्रतिष्ठा कमी होईल

अशा प्रकारची वर्तणूक आपला कार्यकर्ता करणार नाही. आम्हास क्लृप्त्या माहिती नाहीत असे नाही, पण आम्ही त्या करीत नाही. कारण तसे करणे आम्ही अप्रतिष्ठितपणाचे समजतो. खिसे कापणे आम्हांस जमते, परंतु ते आम्ही करीत नाही कारण ते अप्रतिष्ठितपणाचे आहे. म्हणून आम्ही ते करणार नाही. जरी आम्हांस अपयश आले तरी चालेल पण आम्हांस नजिकचा मार्ग नको. सिंह हा कितीही उपाशी असला तरी गवत खाणार नाही. त्याला गवत खाता येत नाही म्हणून तो निकम्मा आहे असे नव्हे. थोडक्यात कोणत्याही कारणांसाठी भा. म. संघाच्या प्रतिष्ठेस बाध आणणे आपणांस चालणार नाही.

**व्यक्तिगत चारित्र्य**

आपल्या भारतीय संस्कृतीत पुढारपण ज्याला करावयाचे आहे त्याचे व्यक्तिगत चारित्र्य चांगले असले पाहिजे. दोन बाबतीत तो अगदी स्वच्छ असला पाहिजे. एक—कनक आणि दुसरे—कांता. या मुख्य दोन गोष्टीत निष्कलंक असावे लागेल. आणि तशी दुसऱ्यांचीही खात्री असावी लागेल. अन्यथा दरवेळी स्पष्टीकरण देण्याचा प्रसंग नको. नाही तर "नाही, नाही—तसे काही नव्हते" असे वारंवार म्हणण्याचा प्रसंग येऊ नये. पुष्कळदा बाहेरच्या वातारणाचा परिणाम म्हणून आपल्यामधील नवीन कार्यकर्त्यांचा गैरसमज होतो.

आपली अशी अपेक्षा आहे की प्रत्येक पै-पै चा हिशेब दिला पाहिजे. आपण उदाहरण देतो ते श्री. जनार्दन स्वामी यांचे. ते दौलताबादच्या किल्ल्यात अकौंटंट म्हणून काम करायचे. त्यांच्या कडून एक पैची चूक झाली, तर रात्रभर जागरण करीत बसले.

दुसरा कोणी म्हणाला असता की एक पै काय ? एक रुपया घे. पण हे रात्री जागण्याचे झंझट कशाला ? नवीन कार्यकर्त्यांच्या मनात विचार येतो की मला हिशोब का मागता ? माझ्यावर विश्वास नाही काय ? ही विश्वासाची बाब नाही. आम्ही जनतेचे उत्तरदायी आहोत. त्यामुळे हिशेब व्यवस्थितच असला पाहिजे. पुष्कळ वेळा युनियन सुरू होते तेव्हा युनियनजवळ पैसाच नसतो. तेव्हा कार्यकर्ता स्वतःच्या खिशातून खर्च करतो. म्हणजे घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यासारखे हे आहे. त्यानंतर तो म्हणतो माझे रु. २०० चे वर खर्च झाले. तो ते मागत नाही. तरी देखील तुम्ही खर्च करा. पण ते लिहून ठेवा. तुमचा पैसा खर्च झाला असे लिहा.

स्वच्छ चारित्र्यात स्वच्छ हिशेब, उघडे हिशेब यांचा समावेश आहे. आणि तो सार्वजनिक जीवनात अत्यंत महत्त्वाचा विषय आहे हे विसरता कामा नये.

अलीकडे आपला समाज प्रगतीशील झाला आहे. त्यामुळे नैतिकता वगैरे या जुन्या बुरसटलेल्या कल्पना आहेत असे लोक म्हणतात. परंतु ते खरे नाही. पश्चिमेकडे देखील तितकेसे खरे नाही. तुम्ही काहीही व्यवहार करा, तुम्हाला मंत्रीपदावर ठेवू असे इंग्लंडमध्येसुद्धा म्हणत नाहीत. प्रोफोम्युचे उदाहरण लक्षात घ्या. म्हणजे पश्चिमेत नैतिकतेला एवढे महत्त्व नाही असे लोक म्हणतात त्या ठिकाणीसुद्धा एखाद्या सार्वजनिक पुढाऱ्याविषयी नैतिकतेचा संशय आला तर त्याला पदच्युत केले जाते.

जो व्यक्तिगत जीवनात नैतिक नाही त्याची सार्वजनिक जीवनात नैतिकतेविषयी खात्री देता येत नाही. त्यामुळे कनक व कांता

या दोन्ही बाबतीत व्यक्तिगत चारित्र्य हे निष्कलंक असावे. आणि ते तसे आहे अशी लोकांना खात्री पटावी ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये काही गडबड असेल तर कोणतीही दयामाया न दाखवता त्याला हटविणे ही आपली परंपरा आहे. आपली पद्धती आहे.

दया कोठे करावयाची, जेथे प्रेरणा एकच आहे, पण तरीही मतभेद आहेत. मुळात चारित्र्य चांगले आहे पण दुसऱ्या काही कारणाने चूक झाली आहे, मानसिक दुर्बलतेमुळे हातून गोष्ट घडली आहे, तेथे दया दाखवावी. परंतु जेथे चारित्र्याचा अभाव आहे त्या ठिकाणी मात्र दया दाखविता येत नाही. म्हणूनच व्यक्तिगत चारित्र्य चांगले असणे हा नेतृत्वाचा प्रमुख निकष आपण ठरविला आहे.

खरोखरच राष्ट्राविषयी, गरीबांविषयी, मजदुरांविषयी जिव्हाळा आहे का ? हा आपल्या दृष्टीने नेतृत्त्वाचा मोठा निकष ठरेल. मी माझेच उदाहरण देतो. मी जेव्हा इंटकच्या जनरल कौन्सिलवर निवडून आलो तेव्हा मला आनंद झाला. टाटानगर मध्ये होतो, तरुण होतो, तेथून मी नागपूरला आलो. तेव्हा अधिकाऱ्यांना सांगितले की मी असा पराक्रम केला आहे. निवडून आलो आहे. विरोध असतानासुद्धा निवडून आलो. हे सांगण्यासाठी आमच्या गुरुजनांकडे गेलो. त्यांनी ऐकून घेतले. म्हणाले, फार चांगले झाले.

त्यानंतर इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. चहा झाला. जायला उठलो. नमस्कार केला, तेव्हा म्हणाले जरा बस. का हो ? तुमचे हे जनरल कौन्सिल काय आहे ? मला जरा समजून सांगा. वस्तुतः त्यांना सगळे माहीत होते. पण त्यांची बोलण्याची शैली

होती. मी ते सगळे सांगितले. मग ते म्हणाले, चांगले झाले. जनरल कौन्सिलवर निवडून आलात. पण माझ्या मनात एक प्रश्न आलाय की तुम्हाला जनरल कौन्सिलवर कोणी निवडून दिले ? मी म्हणालो की अधातु मतदार संघातील मजुरांनी मला निवडून दिले. ते म्हणाले, त्यामध्ये किती मजूर आहेत ? मी म्हटले ५,५०० आहेत. नंतर ते म्हणाले, माझ्या एका प्रश्नाचे उत्तर द्या. या ५,५०० मजुरांविषयी तुमच्या मनात तीच भावना आहे काय, जी तुमच्या आईची तुमच्याबद्दल आहे ? खरे सांगा ? त्यांच्या समोर खोटे बोलण्याची सोय नव्हती. मी म्हटले "प्रामाणिक-पणाने सांगायचे तर तशी काही भावना माझ्या मनात नाही." त्यावर ते म्हणाले, "बरोबर आहे. तुम्ही इंटकचे जनरल कौन्सि-लर शोभता. भगवंताच्या जनरल कौन्सिलचे सदस्य शोभत नाही." वास्तविक त्यांच्या म्हणण्याचा अर्थ एकच होता की खऱ्या नेतृत्वास तू नालायक आहेस. पण निराळ्या शब्दात त्यांनी सांगितले.

त्यावेळी लक्षात असे आले की नेतृत्व करण्यासाठी मातृहृदय हा खरा निकष आहे. ज्यांचे आपल्याला नेतृत्व करायचे त्यांच्या बाबतीत मातृहृदय असावे. आणि खरोखर हे नसेल तर भा. म. संघात नेतृत्व करण्यास आपण पात्र नाही.

**मजबूत संघटन हे आपले धोरण**

या दृष्टीने आपले संघटन मजबूत व्हावे म्हणून काही धोरणे ठरविली आहेत. या धोरणांच्या अंतर्गत चर्चेला वाव आहे. सर्व-साधारण वैशिष्ट्यांचा मी उल्लेख केलेला आहे. आता अशा प्रकारांनी संघटनेचे सर्वसामान्य धोरण ठरल्यानंतर त्या धोरणाच्या अंतर्गतच व्यूहरचनेचा—रणनीतीचा विचार व्हायला पाहिजे.

### व्यूहरचना-रणनीती-स्ट्रॅटेजी

मजुरांचे कल्याण व्हावे असे आपण म्हणतो. त्यासाठी नित्य-सिद्ध राष्ट्रवादी मजूर संघटन असावे अशी आपली इच्छा आहे. भारतीय मजदूर संघ म्हणून आपण असे काम उभे करीत आहोत. प्रश्न असा आहे की आज जे मजुरांवर संकट आले आहे ते दूर करण्यासाठी सरकार आणि भांडवलदार यांच्याशी लढाई करण्यासाठी जी आवश्यक शक्ती लागते ती आमच्याकडे आहे काय? मजुरांना वाचविणे आवश्यक आहे. आक्रमण झालेले आहे. सरकार व भांडवलदारांनी आक्रमण केलेले आहे. आपल्या एकट्याच्या शक्तीने आपण कामगारांना वाचू शकलो तर सोन्याहून पिवळे होईल. दुधात साखर पडल्यासारखे होईल. परंतु वास्तविक आज आपली एवढी शक्ती नाही. मजुरांना कसे वाचवावयाचे? म्हणून निश्चित केलेल्या धोरणाच्या अंतर्गतच आपल्याला रणनीतीचा विचार करावा लागेल.

### संयुक्त मोर्चा

आपल्या एकट्याच्या ताकदीवर लढाई अशक्य आहे. अशावेळी अन्य संघटनांना आपण सरकार व भांडवलदार यांच्या विरोधात खांद्याला खांदा लावून उभे रहायला प्रवृत्त करू शकतो काय? इतरांची शक्ती संयुक्त मोर्चाचे द्वारे आपण उपयोगात आणू शकतो काय? राष्ट्रीय प्रचार समितीसारखी ( एन सी सी सारखी) रचना होऊ शकते काय? हा रणनीतीचा प्रश्न आहे. धोरण ठरलेले आहे. त्या धोरणांशी सुसंगत, परिस्थितीची आवश्यकता म्हणून, अशा प्रकारचे जे काही असते त्याला रणनीती म्हणतात.

रणनीती काय असावी ? संयुक्त मोर्चा असावा की असू नये ? याबद्दल मतभेद होऊ शकतात. पण ही चर्चा निश्चित केलेल्या धोरणांच्या अंतर्गतच झाली पाहिजे. धोरण निश्चित आहे. मजुरांच्या कल्याणासाठी नित्यसिद्ध राष्ट्रवादी संघटन उभे करायचे. आणि ते जर कमी पडत असेल तर संयुक्त मोर्चा करावा की करू नये हा रणनीतीचा प्रश्न आहे. पण अशी रणनीती ठरली तरी तेवढयाने सगळे होते असे नाही.

**रणनीतीची अंमलबजाणी**

रणनीतीची अंमलबजावणी कशी होईल ? अशा संयुक्त मोर्चात पुष्कळ गैरसमज उभयपक्षी निर्माण होतात. मी असे पाहिले आहे की साधारणतः आपले लोक सज्जन असल्यामुळे निरनिराळया प्रकारचे गैरसमज निर्माण होतात.

संयुक्त मोर्चा जेव्हा आपण निर्माण करतो, तेव्हा राष्ट्रीय प्रचार समितीचे उदाहरण मी देतो. ही एक व्यूहरचना आहे. ही काही नित्य रचना नाही, व्यूहरचना आहे त्यामुळे संयुक्त मोर्चा सर्वांचा आहे. एन. सी. सी. निर्माण झाल्यावर आपल्या लोकांच्या मनात आले, आपण आता संयुक्त मोर्चात आहोत. त्यामुळे इतरांशी भांडायचे नाही. आणि याचा फायदा घेऊन इतर संघटनांनी अलग अलग उद्योगांमध्ये असे काम केले की भा. म. संघाच्या संघटनांवर आक्रमण करायचे. आणि स्वतःची सभासद संख्या वाढवायची. आणि आपल्या लोकांनी म्हणायचे, आम्ही तर संयुक्त मोर्चात आहोत, आम्हांस तसे वरून सांगितले आहे, तेव्हा बाकीच्या युनियनशी कसे भांडणार ? तर हा विचार बरोबर नाही.

संयुक्त मोर्चा करावयाचा ही व्यूहरचना आहे. व्यूहरचनेच्या

अंतर्गत कसे वागायचे हा डावपेचाचा प्रश्न आहे. आणि डावपेच कसे असावेत, कसे असू नयेत या विषयी एकापेक्षा अधिक मते असू शकतात. संयुक्त मोर्चा म्हणजे सर्व प्रश्नांविषयी सर्वकाळ आम्ही इतरांशी बांधले गेलो आहोत असा त्याचा अर्थ नाही. एका विशिष्ट गोष्टीकरता सरकारशी लढाई आहे. त्या विशिष्ट मुद्यावर संयुक्त मोर्चा निर्माण झाला आहे. त्या मुद्यापुरते आम्ही सर्व एक आहोत. परंतु तो मुद्दा सोडून अन्य जे प्रश्न आहेत त्याविषयी आम्हाला एकमेकांशी वेगळेपणा ठेवण्याचा, पृथक रहाण्याचा पूर्ण अधिकार आहे.

अलग अलग स्तरांवर आपल्या संघटनांना नित्याच्या कामात अन्य संघटनांशी भांडण्याचा देखील अधिकार आहे. त्यामुळे असे होऊ शकते की काही महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर ज्यासाठी आम्ही संयुक्त मोर्चा निर्माण केला आहे त्याविषयी आम्ही अन्य संघटनांच्या खांद्याला खांदा लावून उभे रहात आहोत. आणि सरकारला शिव्या देणारी भाषणे करीत आहोत. आणि याच्या पाच दहा मिनिटे आधी आणि पाच दहा मिनिटे नंतर आमच्या औद्योगिक किंवा कारखाना स्तरावर आम्ही एकमेकांची मारपीट करतो आहोत हे सहज होऊ शकते. कारखाना स्तरावर खांद्याला खांदा लावून उभे राहणे, भाषणे देणे ही निराळी गोष्ट आहे. अन्य संघटनांच्या बरोबर काम करताना कार्यकर्त्यांनी हे नीट ध्यानात ठेवले पाहिजे.

मी दिल्लीचे उदाहरण देतो. एकदा १८ मे रोजी राष्ट्रीय प्रचार समितीची मीटिंग होती. सगळ्या व्यवस्था आपल्याकडे होत्या. इतर संघटनांना वाटत होते की त्यामुळे भा. म. संघाचे महत्त्व वाढेल. त्यांना राष्ट्रीय प्रचार समिती तर आवश्यक वाटत होती. कारण सरकारच्या विरोधात सगळे एकत्रित आल्याशिवाय

उपयोग नव्हता. इलाज नव्हता. परंतु भा. म. संघाचे महत्त्व वाढू नये म्हणून ११ मे रोजीच त्यांनी संप घोषित केला. आपल्या लोकांनी विरोध केला. आणि विरोध केल्यानंतर ३ ठिकाणी मारामाऱ्या झाल्या. जवळ जवळ पस्तीस एक माणसे तरी दवाखान्यात पाठवावी लागली. कित्येक लोक अटक झाले. ही गोष्ट ११ मेला झाली. परंतु, १८ मे रोजी सगळ्या युनियनसह सरकारला विरोध करण्यासाठी आपण खांद्याला खांदा लावून उभे होतो. १९ मे रोजी पुन्हा मारपीट झाली. तेव्हा अलग अलग स्तरावर असे होऊ शकते.

थोडक्यात संयुक्त मोर्चा म्हणजे वैदिक विवाह होय. जेथे सात जन्म हाच पती लाभो अशी प्रतिज्ञा नाही. हे एक तलाख मॅरेज आहे. तीनदा 'तलाख' म्हटले की मॅरेज तुटले. संयुक्त मोर्चा ही एक व्यूहरचना आहे.

**व्यूहरचनेत घ्यायची काळजी**

व्यूहरचनेच्या अंतर्गत डावपेच काय असावेत याबाबत चर्चा करावी लागेल आणि या डावपेचाच्या अंतर्गत कार्यक्रम कोणते असावेत याची चर्चा करणे आवश्यक आहे.

संयुक्त मोर्चा म्हटल्याबरोबर काही गोष्टी निश्चित केल्या पाहिजेत. सर्वात प्रथम कोणत्या कारणाकरता संयुक्त मोर्चा करणार? याविषयी एकमत हवे. दुसरे कार्यपद्धती काय रहाणार? त्या कार्यपद्धतीचा अवलंब कसा करणार? त्यामध्ये कोणी एक दुसऱ्यावर कुरघोडी करू शकू नये हे पाहिले पाहिजे. त्यानंतर तिसरे असे की आपण घोषणा कोणत्या देणार? सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की ज्या ठरलेल्या गोष्टी आहेत त्या ठरल्याप्रमाणे

झाल्या पाहिजेत. ठरलेल्या गोष्टीच्या विरुद्ध जर कोणी व्यवहार केला तर आम्ही तिथल्या तिथे त्याची पिटाई करू. हे त्याला स्पष्ट करण्यात आले पाहिजे.

डावपेच

रणनीतीचे अंतर्गत डावपेचांचा भाग असतो. त्यामध्ये आधी ठरलेल्या गोष्टीखेरीज इतर गोष्टींवर आपण बोलणार नाही. इतरांना बोलू देणार नाही. हे कसे घडवायचे, ठरलेल्या घोषणांखेरीज अन्य घोषणा देण्याचा मोह किंवा हिंमत इतरांना होऊ नये हे कसे पहायचे. इतरांनी आपल्या कार्यकर्त्यांची तयारी आणि इतरांवर दहशत अथवा प्रेमाची समजावणी हे कसे घडवावयाचे हा सर्व डावपेचांचा भाग आहे.

डावपेचांच्याच चौकटीत कार्यक्रमांचा विचार व्हायला पाहिजे, मग त्या ठिकाणी बारीक सारीक गोष्टींचा प्रश्न येतो. मीटिंग कोठे घ्यायची, मिरवणूक काढायची की नाही, पहिल्या रांगेत किती माणसे असावीत. पाच असतील तर पाचही संघटनांचे प्रमुख असावेत. झेंड्याची उंची काय असावी, झेंड्यांचे आकार काय असावे ? किती झेंडे असावेत ? प्रत्येकाने समान संख्येत झेंडे आणावेत काय ? सभा होणार असेल तर अध्यक्ष कोण ? एका सभेला तुमची व्यवस्था तर दुसऱ्या सभेला आमची व्यवस्था असावी. वक्त्यांचा क्रम कसा असावा, मिरवणुकीत पहिली युनियन कोणती, दुसरी कोणती, तिसरी कोणती राहील ? वक्त्यांचा क्रम एकदा एक असेल तर दुसऱ्या सभेत दुसऱ्या पद्धतीने राहू शकतो का ? या ज्या सगळ्या रचना कार्यक्रमांच्या आहेत त्या डावपेचांच्या चौकटीतच व्हायला पाहिजेत.

उलटपक्षी आम्ही स्वतंत्रपणे एखादा निर्णय घेतला आणि इतर कोणाबरोबरही जाणार नाही अशाच प्रकारचे धोरण आमचे असेल, तशीच व्यूहरचना असेल तर त्याला धरूनच आमचे कार्य-क्रम इतरांच्या कार्यक्रमांवर मात करणारे कसे असू शकतील, इतरांच्या कार्यक्रमांच्यापेक्षा आमची वेळ सोयिस्कर असेल काय ? त्यांच्यापेक्षा आपले झेंडे जास्त रहातील काय ? आमच्या घोषणा इतरापेक्षा अधिक आकर्षक रहातील ना ? इ. गोष्टींचा विचार करावा लागेल.

थोडक्यात, कार्यक्रम हे डावपेचांच्या चौकटीत, डावपेच हे रणनीतीच्या चौकटीत, रणनीती ही धोरणाच्या चौकटीत, धोरण हे नजिकच्या उद्दिष्टांच्या चौकटीत आणि नजिकचे उद्दिष्ट हेही अंतिम उद्दिष्टाच्या चौकटीत आणि अंतिम उद्दिष्ट हे ध्येयवादाच्या चौकटीत अशा पद्धतीने आपण विचारांची पद्धती ठेवली आहे.

वर सांगितल्याप्रमाणे आमचा ध्येयवाद आणि आमचे अंतिम गंतव्यस्थान या विषयी कोणत्याही प्रकारची चर्चा आम्ही करू इच्छीत नाही. ज्यांना या गोष्टी पसंत नाहीत त्यांनी भा. म. संघात येऊच नये. आम्ही त्यांना आताच सुट्टी द्यायला तयार आहोत. परंतु एकदा ध्येयवाद आणि अंतिम उद्दिष्टे मान्य केली तर नजिकच्या उद्दिष्टांसंबंधी उच्च स्तरावर चर्चा करण्यास काही वाव आहे. बाकी सर्व गोष्टींबाबत सर्व प्रकारच्या चर्चेस वाव आहे. येथे लोकशाही आहे. आमची लोकशाही ही अनुशासन-बद्ध आहे. आम्हांस लोकशाहीतील अनुशासन किंवा अनुशासना-तील लोकशाही अभिप्रेत आहे. दोन्ही गोष्टींचा येथे समन्वय झालेला आहे. या गोष्टीची जाणीव कार्यक्रमापासून धोरणापर्यंत

होऊ शकते. थोडया प्रमाणात उच्च स्तरावर नजिकच्या उद्दिष्टां-बद्दलही चर्चा होईल.

परंतु कोणत्याही स्थितीत आमचा ध्येयवाद किंवा आमची उद्दिष्टे या विषयी चर्चा नाही. आपली रचना अशा प्रकारची आहे. हीच एकमात्र रीती नीती, पद्धती, आपली आहे. जिच्यानुसार आपण चालतो आहोत. इतर सर्व संस्थांपेक्षा ही रीती, नीती पद्धती थोडीशी निराळी आहे.

ही रीती, नीती, पद्धती चांगली आहे की वाईट आहे हा मुद्दा नाही. परंतु अन्य संस्थेपेक्षा ती निराळी आहे त्यामुळे आपण असे म्हटले आहे की भा. म. संघ ही एक इतरांपेक्षा अलग, निराळी, पृथक अशी कामगार संघटना आहे, हे भा. म. संघाचे वैशिष्टच आहे.

ही रीती, नीती, पद्धती नीट समजावून घेऊन आपापल्या ठिकाणी आपण अधिक विचार करावा इतके म्हणणे आज पुरेसे आहे.